# देवाचे दान



एड्रियन एबन्स

देवाचे ज्ञान
महान संघर्षाची ओळख

ऑगस्ट २०१० मध्ये लिखित नोव्हेंबर २०२५ मध्ये अद्ययावत
कॉपीराइट © २०२५, Adrian Ebens
Maranatha Media

लेखकाचे नैतिक हक्क सुरक्षित आहेत.
ही पुस्तिका आणि Maranatha Media ची इतर सर्व प्रकाशने maranathamedia.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अतिरिक्त प्रती मागवण्यासाठी कृपया [adrian@maranathamedia.com](mailto:adrian@maranathamedia.com) या ईमेलवर संपर्क साधा.

हे पुस्तक
लेखक: एड्रियन एबन्स
संपादन व शुद्धलेखन: दानूतासन ब्राऊन
मुखपृष्ठ रचना: एड्रियन एबन्स
टाइपसेट: 10.5/14 Palatino Linotype

ही पुस्तिका मूळतः लेखांच्या मालिकेच्या स्वरूपात लिहिली गेली होती. नंतर त्या लेखांना एकत्र करून तिचे सध्याचे स्वरूप देण्यात आले. या पुस्तकात पिता आणि पुत्र यांच्यातील नातेसंबंधाशी संबंधित महान संघर्षाच्या उगमाचे वर्णन केले आहे. ही सामग्री "ओळख संदेश" (Identity Message) समजून घेण्यासाठी आणि आपल्याला आपले खरे मूल्य कसे प्राप्त होते यासाठी मूलभूत आहे.

विश्वास, आशा आणि प्रीतीसह,
एड्रियन एबन्स

**July, 2026**

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई सुनीता मोहिते यांनी मदत केली आहे.

# अनुक्रमणिका

१. आपला पिता....... 4

२. सर्वांचा सार्वभौम....... 7

३. देवाचे ज्ञान....... 9

४. समानता....... 13

५. इच्छाशक्ती....... 16

६. एक संकट निर्माण होते....... 17

७. त्याच्या प्रतिरूपात निर्माण केलेले....... 21

८. लबाडीचा पिता....... 25

९. मानवजातीची फसवणूक....... 27

१०. सारांश....... 32

१२. बाबेलचा पाया....... 35

१३. बाबेलचे सार....... 39

१४. वंशपरंपरेचा मागोवा....... 43

१५. बाबेलमधून पाचारण....... 47

## १. आपला पिता

एकदा येशूकडे त्याचे अनुयायी आले आणि त्यांनी त्याच्याकडे एक अत्यंत महत्त्वाची विनंती केली:

मग असे झाले की, तो एका ठिकाणी प्रार्थना करत होता; ती त्याने समाप्त केल्यावर त्याच्या शिष्यांतील एकाने त्याला म्हटले, "प्रभूजी, जसे योहानाने आपल्या शिष्यांना प्रार्थना करण्यास शिकवले तसे आपणही आम्हांला शिकवा." (लूक ११:१)

येशूने दिलेल्या उत्तरातून आपल्याला देवाविषयीची सर्वात महत्त्वाची गोष्ट समजते. प्रार्थना म्हणजे देवाशी बोलण्याचा आणि त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न होय. येशूने देवाचा उल्लेख करण्यासाठी सर्वप्रथम जे नाव वापरले, ते देवाची मूलभूत ओळख आणि तो कोण आहे हे प्रकट करते. प्रार्थना करताना देवाला कसे संबोधावे, हे येशूने आपल्याला असे शिकवले:

तो त्यांना म्हणाला, "तुम्ही प्रार्थना कराल तेव्हा असे म्हणा : "हे [आमच्या स्वर्गातील] पित्या,..."'" (लूक ११:२)

आपला पिता. देवाविषयी आपण इतर कोणतीही गोष्ट विचारात घेतली, तरी सर्वप्रथम आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देव हा पिता आहे. हे साधे वर्णन आपल्याला देवाविषयी बरेच काही सांगते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, देव हा नातेसंबंध जपणारा आहे. तो आपल्याला त्याच्याशी नात्याच्या भाषेत बोलावे अशी इच्छा करतो. "पिता" हा शब्द केवळ सामर्थ्य किंवा क्षमता यांचाच अर्थ व्यक्त करत नाही, तर तो संपूर्ण विश्वाशी असलेल्या त्याच्या नातेसंबंधाचा आणि जोडणीचा अर्थही व्यक्त करतो. तो सर्व गोष्टींचा पिता, म्हणजेच उगम आहे. मग देव कशा प्रकारचा पिता आहे?

एकदा मोशेने देवाला विनंती केली की त्याने आपले गौरव, म्हणजे त्याच्याविषयीची सर्वांत विशेष गोष्ट, त्याला दाखवावी. तेव्हा देवाने असे उत्तर दिले:

तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने 'परमेश्वर' ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : "परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर1 दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा" (निर्गम ३४:५–६)

देवाने मोशेला काय दाखवले, ते लक्षात घ्या. त्याने आपल्या स्वभावाविषयी सांगितले. देवाचा सर्वांत गौरवशाली पैलू म्हणजे त्याचा स्वभाव. तो दयाळू, कृपाळू, सहनशील आणि चांगुलपणा व सत्याने परिपूर्ण आहे. ज्या जगात आपण राहतो, तेथे हे गुण फारच दुर्मिळ आहेत. परंतु जेव्हा हे गुण आपल्याला इतरांमध्ये अनुभवायला मिळतात, तेव्हा आपल्यापैकी बहुतेक जण त्यांची मनापासून कदर करतात. प्रेषित योहानाने देवाच्या स्वभावाचा सारांश पुढील शब्दांत मांडला आहे:

"जो प्रीती करत नाही तो देवाला ओळखत नाही; कारण देव प्रीती आहे." (१ योहान ४:८)

देव हा प्रेमळ पिता आहे. त्याला आपल्या संपूर्ण सृष्टीची मनापासून काळजी आहे. मग त्याची सृष्टी किती विशाल आहे? बायबल आपल्याला सांगते की तो स्वर्गातील आणि पृथ्वीवरील सर्वांचा पिता आहे.

ह्या कारणास्तव स्वर्गातील व पृथ्वीवरील प्रत्येक वंशास ज्या पित्यावरून नाव देण्यात येते, त्या [प्रभू येशू ख्रिस्ताच्या] पित्यासमोर मी गुडघे टेकून अशी विनंती करतो की, (इफिसकर ३:१४–१५)

हे संपूर्ण विश्व आपल्या स्वर्गीय पित्याचे आहे आणि या विश्वातील प्रत्येक जण त्याच्या कुटुंबाचा भाग आहे. इतके असंख्य लोक असल्यामुळे, देव प्रत्येकाचा विचार करू शकत नाही आणि काहींना तो विसरत असेल, असे आपल्याला वाटू शकते. पण याविषयी येशूने काय म्हटले ते लक्षपूर्वक ऐका.

पाच चिमण्या दोन दमड्यांना विकतात की नाही? तरी त्यांच्यापैकी एकीचाही देवाला विसर पडत नाही. फार तर काय, तुमच्या डोक्याचे सर्व केसही मोजलेले आहेत. भिऊ नका; तुम्ही अनेक चिमण्यांपेक्षा मूल्यवान आहात. (लूक १२:६–७)

देव कोणालाही विसरत नाही. त्याला आपल्याविषयी सर्व काही माहीत आहे. आपल्या जीवनात काय घडत आहे, आपण काय करीत आहोत आणि आपण काय विचार करीत आहोत यामध्ये त्याला मनापासून रस आहे. खरे तर, तो आपला विचार करणे कधीही थांबवत नाही.

हे परमेश्वरा, माझ्या देवा, तू आमच्यासाठी केलेली अद्भुत कृत्ये व आमच्याविषयीचे तुझे विचार पुष्कळ आहेत; तुझ्यासमोर त्यांची क्रमवार मांडणी करता येणार नाही; मी ते सांगू लागलो तर ते माझ्या गणनेपलीकडे आहेत. (स्तोत्रसंहिता ४०:५)

आपल्यासाठी त्याच्या विशेष योजना आहेत आणि आपण काय बनू शकतो याविषयी त्याची स्वप्ने आहेत.

"परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; ते तुम्हांला तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत." (यिर्मया २९:११)

आपल्याजवळ असलेली प्रत्येक चांगली गोष्ट त्याच्याकडूनच येते.

प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला विकार नाही व जो फिरण्याने छायेत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून ते उतरते. (याकोब १:१७)

देवाला आपल्याविषयी काय वाटते, याचे सर्वांत सुंदर प्रकटीकरण त्याने आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या म्हणजे येशूच्या बाप्तिस्म्याच्या वेळी केले. त्याने असे म्हटले:

आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, “हा माझा ‘पुत्र’, मला ‘परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.”’ (मत्तय ३:१७)

देवाने आपल्या पुत्रावर मनुष्य म्हणून प्रेम केले. तो त्याच्यावर अत्यंत संतुष्ट होता. यातील सर्वांत अद्भुत गोष्ट म्हणजे, येशू हा देवाचा पुत्र आहे हे ओळखल्याने आपणही हाच स्वीकार अनुभवू शकतो.

"...त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे." (इफिसकर १:६)

येशूची भूमिका काय आहे, तो पृथ्वीवर का आला, आणि त्याच्याद्वारे आपल्याला स्वीकार मिळणे का आवश्यक आहे, याविषयी आपण पुढे अधिक सविस्तर पाहू. परंतु येथे आपण विशेष भर द्यायचा मुद्दा हा आहे की, देव हा प्रेमळ व कोमल पिता आहे. त्याला आपली मनापासून काळजी आहे आणि आपल्या जीवनातील प्रत्येक गोष्टीमध्ये त्याला रस आहे.

## २. सर्वांचा सार्वभौम

मागील अध्यायात आपण पाहिले की देव हा प्रेमळ पिता आहे, जो सतत आपला विचार करतो आणि आपल्या भविष्याविषयी योजना व स्वप्ने बाळगतो. आपण हेही पाहिले की तो संपूर्ण विश्वाचा पिता आहे. या विभागात, देवाला हे स्थान धारण करण्यास आणि तो जे काही करतो ते करण्यास कोणते गुण समर्थ करतात, ते आपण पाहणार आहोत.

बायबल सर्वप्रथम आपल्याला सांगते की देव हा सर्व गोष्टींचा प्रभू आणि सार्वभौम आहे.

तरी आपला एकच देव म्हणजे पिता आहे, त्याच्यापासून अवघे झाले व आपण त्याच्यासाठी आहोत..." (१ करिंथकर ८:६)

"जो सनातन, अविनाशी, अदृश्य राजा, असा एकच ज्ञानी देव, त्याला सन्मान व गौरव युगानुयुग असो. आमेन." (१ तीमथ्य १:१७)

"हे इस्राएला, श्रवण कर; आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे;" (अनुवाद ६:४)

पिता हा एकमेव देव आहे, ज्याच्यापासून सर्व गोष्टी उत्पन्न झाल्या आहेत. देवाला त्याचे सामर्थ्य, ज्ञान किंवा बुद्धी इतर कोणाकडून मिळालेली नाही. आपण जे काही पाहतो ते सर्व त्याच्यापासून आले आहे.

पाहा, प्रभू परमेश्वर पराक्रम्यासारखा येत आहे; त्याचा भुज त्याचे प्रभुत्व चालवील; पाहा, वेतन त्याच्याजवळ आहे, व प्रतिफळ त्याच्या हाती आहे. मेंढपाळाप्रमाणे तो आपल्या कळपास चारील, कोकरे आपल्या कवेत घेऊन उराशी धरून वाहील, आणि पोरे पाजणाऱ्यांना सांभाळून नेईल. जलांचे माप आपल्या चुळक्याने कोणी केले आहे? आकाशाचे माप आपल्या वितीने कोणी घेतले आहे? पृथ्वीची धूळ मापाने कोणी मापली आहे? डोंगर काट्याने व टेकड्या तराजूने कोणी तोलल्या आहेत? परमेश्वराच्या आत्म्याचे नियमन कोणी केले आहे? त्याचा मंत्री होऊन त्याला कोणी शिकवले आहे? त्याने कोणाला मसलत विचारली? सन्मार्गाविषयी समज देऊन त्याला कोणी शिक्षण दिले? त्याला कोणी ज्ञान शिकवले? सुज्ञतेचा मार्ग त्याला कोणी

दाखवला? पाहा, त्याच्या हिशोबी राष्ट्रे पोहऱ्यांतल्या जलबिंदूसमान, तराजूतल्या रजासमान आहेत; पाहा, द्वीपेही तो धुळीच्या कणांसारखी उचलतो. (यशया ४०:१०–१५)

हे देवा, तुझे वात्सल्य किती अमोल आहे! मानवजाती तुझ्या पंखांच्या छायेचा आश्रय करते! तुझ्या घरातील समृद्धीने त्यांची तृप्ती होईल, आणि तू आपल्या सुखांच्या नदीचे पाणी त्यांना पाजशील. कारण जीवनाचा झरा तुझ्याजवळ आहे; तुझ्या प्रकाशाने आम्ही प्रकाश पाहतो. (स्तोत्रसंहिता ३६:७–९)

देव सर्वशक्तिमान आहे, म्हणजे त्याचे सामर्थ्य अमर्याद आहे; त्याला अंत नाही. अब्जावधी अणूंमध्ये असलेले सामर्थ्य त्याच्यापासूनच येते. ते सामर्थ्य मानवी आकलनाच्या पलीकडचे आहे. देवाचे ज्ञान अनंत आहे; ते अगाध आणि असीम आहे. एखादी गोष्ट सुरू होताच तिचा शेवट काय असेल हे त्याला अचूक माहीत असते. सर्व बुद्धी आणि ज्ञान त्याच्याकडूनच येते.

हे सामर्थ्य आणि ही बुद्धी त्याच्या आत्म्याद्वारे नदीप्रमाणे आपल्यापर्यंत प्रवाहित होते.

नंतर त्याने देवाच्या व कोकऱ्याच्या राजासनातून 'निघालेली' नगरीच्या मार्गावरून वाहणारी 'जीवनाच्या पाण्याची' स्फटिकासारखी नितळ 'नदी' मला दाखवली. (प्रकटीकरण २२:१)

जिचे प्रवाह देवाच्या नगरीला, परात्पराच्या परमपवित्र निवासस्थानाला आनंदमय करतात अशी एक नदी आहे. 5त्या नगरीच्या ठायी देव आहे; ती ढळावयाची नाही; प्रभात होताच देव तिला साहाय्य करील. (स्तोत्रसंहिता ४६:४–५)

त्याच्या आत्म्याद्वारे देव एकाच वेळी सर्व ठिकाणी उपस्थित राहू शकतो. या गुणाला आपण सर्वव्यापकता असे म्हणतो. हेही समजण्यास अतिशय कठीण आहे; परंतु बायबल काय सांगते ते पाहा.

मी तुझ्या आत्म्यापासून कोठे निघून जाऊ? मी तुझ्या समक्षतेपासून कोठे पळून जाऊ? मी वर आकाशात चढलो तरी तेथे तू आहेस; अधोलोकी मी आपले अंथरूण केले तरी पाहा, तेथे तू आहेस. मी पहाटेचे पंख धारण करून समुद्राच्या अगदी पलीकडल्या तीरावर जाऊन राहिलो, तरी तेथेही तुझा हात मला चालवील; तुझा उजवा हात मला

धरून ठेवील. (स्तोत्रसंहिता १३९:७–१०)

ही नदी म्हणजे जीवनाची नदी आहे. जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आत्म्याकडून येतात. त्याचा जीवनदायी आत्माच आपल्यामध्ये वास करतो, आपल्याला जिवंत ठेवतो आणि आपले हृदय धडधडत ठेवतो.

ज्या देवाने जग व त्यातले अवघे निर्माण केले तो स्वर्गाचा व पृथ्वीचा प्रभू असून हातांनी बांधलेल्या मंदिरात राहत नाही; 25आणि त्याला काही उणे आहे, म्हणून माणसांच्या हातून त्याची सेवा घडावी असेही नाही; कारण जीवन, प्राण व सर्वकाही तो स्वतः सर्वांना देतो. 26आणि त्याने एकापासून माणसांची सर्व राष्ट्रे निर्माण करून त्यांनी पृथ्वीच्या संबंध पाठीवर राहावे असे केले आहे; आणि त्यांचे नेमलेले समय व त्यांच्या वस्तीच्या सीमा त्याने ठरवल्या आहेत; 27अशासाठी की, त्यांनी देवाचा शोध करावा, म्हणजे चाचपडत चाचपडत त्याला कसेतरी प्राप्त करून घ्यावे. तो आपल्यापैकी कोणापासूनही दूर नाही; 28‘कारण आपण त्याच्या ठायी जगतो, वागतो व आहोत;’ तसेच तुमच्या कवींपैकीही कित्येकांनी म्हटले आहे की, ‘आपण वास्तविक त्याचा वंश आहोत.’ (प्रेषितांची कृत्ये १७:२४–२८)

तर सारांश असा की, एकच देव आहे. तो सर्वशक्तिमान आहे, त्याचे ज्ञान अनंत आहे, आणि तो आपल्या आत्म्याद्वारे सर्वत्र उपस्थित असतो. सर्व अधिकार आणि सर्व सामर्थ्य त्याचेच आहे, आणि तो ज्याला हे देतो त्यालाच ते प्राप्त होते.

## ३. देवाचे ज्ञान

सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञानी असलेला देव अशी एखादी गोष्ट करू शकत नाही, ही कल्पनाच आश्चर्यकारक वाटते. परंतु अशी एक गोष्ट होती, जी इतकी महत्त्वाची होती की तिच्याशिवाय देव पिता आपले राज्य स्थापन करू शकत नव्हता.

जेव्हा आपण या सत्याचा अधिक सखोल विचार करतो की सर्व जीवन, सर्व सामर्थ्य आणि सर्व ज्ञान देवापासून येते, तेव्हा आपल्याला हे जाणवते की देवाने आपल्या विश्वातील लाखो रहिवाशांना निर्माण करून त्यांना केवळ आज्ञांची यादी देऊन, "या आज्ञांचे पालन करा," असे सांगणे शक्य नव्हते. देवाच्या अधीन राहण्याची, त्याच्यावर विश्वास ठेवण्याची आणि त्याच्या मार्गाने चालण्याची क्षमता ही देवाच्या

राजासनातून वाहणाऱ्या त्या जीवननदीचाच एक भाग असणे आवश्यक होते.

परंतु येथे एक समस्या होती. देव स्वतः कोणाच्याही अधीन राहत नाही. त्याला कोणाची आज्ञा पाळण्याची किंवा दुसऱ्याच्या मार्गाने चालण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे तो हे गुण स्वतःच्या अनुभवातून देऊ शकत नव्हता. म्हणून आपल्या महान ज्ञानाने देवाने स्वतःपासून आपल्या तंतोतंत प्रतिमेत एक पुत्र उत्पन्न केला. त्याच्याजवळ जे काही होते ते सर्व त्याने आपल्या पुत्राला दिले आणि त्याच्याद्वारे सर्व गोष्टी निर्माण केल्या. हे लक्षात घ्या:

देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्या द्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला. 2तो ह्या काळाच्या शेवटी पुत्राच्या द्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारस करून ठेवले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व निर्माण केले. 3हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि [स्वतः आमच्या] पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.' 4ज्या मानाने त्याला वारशाने देवदूतांपेक्षा श्रेष्ठ नाव मिळाले आहे त्या मानाने तो त्यांच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. कारण त्याने कोणत्या देवदूताला कधी असे म्हटले, "तू माझा पुत्र आहेस, आज मी तुला जन्म दिला आहे"? आणि पुन्हा, "मी त्याला पिता असा होईन, आणि तो मला पुत्र असा होईल"? (इब्री १:१–५)

कारण पित्याच्या ठायी जसे स्वतःचे जीवन आहे तसे पुत्राच्या ठायीही स्वतःचे जीवन असावे असे त्याने त्याला दिले; (योहान ५:२६)

ह्यावरून येशूने त्यांना उत्तर दिले : मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, पुत्र पित्याला जे काही करताना पाहतो त्यावाचून त्याला स्वतः होऊन काहीही करता येत नाही; कारण जे काही तो करतो ते पुत्रही तसेच करतो. (योहान ५:१९)

ज्याने मला पाठवले तो माझ्याबरोबर आहे; त्याने मला एकटे सोडले नाही, कारण जे त्याला आवडते ते मी सर्वदा करतो." (योहान ८:२९)

येशूने त्यांना म्हटले, "देव जर तुमचा पिता असता तर तुम्ही माझ्यावर प्रीती केली असती; कारण मी देवापासून निघालो व आलो आहे; मी आपण होऊन आलो नाही, तर त्यानेच मला पाठवले. (योहान ८:४२)

ख्रिस्ताप्रमाणे नसलेले, तर माणसांच्या संप्रदायाप्रमाणे, जगाच्या प्राथमिक शिक्षणाप्रमाणे असलेले तत्त्वज्ञान व पोकळ भुलथापा ह्यांच्या योगाने तुम्हांला कोणी ताब्यात घेऊन जाऊ नये म्हणून लक्ष द्या; कारण ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते, आणि जो सर्व सत्तेचे व अधिकाराचे मस्तक आहे त्याच्यामध्ये तुम्ही पूर्ण केलेले आहात. (कलस्सैकर २:८–१०)

देवाच्या विश्वासाठी आवश्यक असलेले सर्व काही आता त्याच्या पुत्रामध्ये वास करत होते म्हणजे सामर्थ्य, ज्ञान, जीवन, तसेच विश्वास, आज्ञाधारकता, पित्याच्या अधिकाराची ओळख आणि पित्याच्या प्रीतीचा व स्वीकाराचा अनुभव. देवाचा पुत्र हा स्वतः देवाची परिपूर्णता आहे आणि देवाच्या राज्याचा संपूर्ण पाया आहे.

ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले; 10ह्यात हेतू हा की, स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा, 11आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे. (फिलिप्पैकरांस २:९–११)

म्हणून पित्याने आपल्या पुत्राला उच्च केले आणि त्याला संपूर्ण विश्वासाठी दैवी सामर्थ्य व आदर्श म्हणून स्थापित केले. देव आपल्या पुत्राचा आत्मा प्रत्येक निर्माण केलेल्या प्राण्याच्या जीवनात देणार होता, जेणेकरून त्यांना जीवन, आशीर्वादाची जाणीव, तसेच अधीन राहण्याचे, विश्वास ठेवण्याचे आणि आज्ञापालन करण्याचे ज्ञान प्राप्त व्हावे. ख्रिस्ताच्या आत्म्याशिवाय देवाच्या अधीन कसे राहावे, त्याच्यावर विश्वास कसा ठेवावा आणि त्याची आज्ञा कशी पाळावी हे जाणणे अशक्य आहे. हे लक्षात घ्या:

नंतर त्याने देवाच्या व कोकऱ्याच्या राजासनातून ‘निघालेली’ नगरीच्या मार्गावरून वाहणारी ‘जीवनाच्या पाण्याची’ स्फटिकासारखी नितळ ‘नदी’ मला दाखवली. (प्रकटीकरण २२:१)

परंतु जो पित्यापासून निघतो, ज्याला मी पित्यापासून तुमच्याकडे पाठवीन तो कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा येईल तेव्हा तो माझ्याविषयी साक्ष देईल; (योहान १५:२६)

परंतु तुमच्यामध्ये जर देवाचा आत्मा वसती करत आहे, तर तुम्ही देहाच्या अधीन

नाही, आत्म्याच्या अधीन आहात. जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा प्राप्त झालेला नसेल तर तो ख्रिस्ताचा नाही. 10पण ख्रिस्त तुमच्यामध्ये असेल तर शरीर जरी पापामुळे मेलेले आहे, तरी आत्मा नीतिमत्त्वामुळे जिवंत आहे. (रोमकर ८:९–१०)

येशूला म्हणूनच देवाचे ज्ञान व देवाचे सामर्थ्य असे म्हटले जाते. ख्रिस्ताचे व्यक्तिमत्त्व देवाच्या आत्म्याद्वारे संपूर्ण विश्वात प्रत्येक निर्माण केलेल्या प्राण्यामध्ये पोहोचविले जाते. ख्रिस्ताचे जे ज्ञान आपल्या अंतःकरणात येते तेच आपल्याला पित्यावर प्रीती करायला व त्याची आज्ञा पाळायला शिकवते; आणि ख्रिस्ताचे जीवनच आपल्या शरीरातील प्रत्येक मज्जातंतू व प्रत्येक पेशीला चेतना देऊन आपल्याला जिवंत ठेवते.

परंतु पाचारण झालेल्या यहूदी व हेल्लेणी अशा दोघांनाही ख्रिस्त हा देवाचे सामर्थ्य व देवाचे ज्ञान आहे. (१ करिंथकर १:२४)

त्याच्याकडून तुम्ही ख्रिस्त येशूमध्ये आहात, तो देवापासून आपल्याला ज्ञान म्हणजे नीतिमत्त्व आणि पवित्रीकरण व खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती असा झाला आहे; (१ करिंथकर १:३०)

म्हणून मनुष्यामध्ये असलेला ख्रिस्ताचा आत्माच त्याला ज्ञान देतो, जेणेकरून तो योग्य गोष्टी करू शकेल आणि नीतिमान व चांगले जीवन जगू शकेल. शलमोनाने याविषयी सांगितले आहे आणि ज्ञान विश्वामध्ये कसे कार्य करते हे स्पष्ट केले आहे.

मी जे ज्ञान त्या माझी वस्ती चातुर्याबरोबर आहे; आणि विद्या व विवेक ही मी प्राप्त करून घेतली आहेत. परमेश्वराचे भय धरणे म्हणजे दुष्कर्माचा द्वेष करणे होय; गर्व, अभिमान, कुमार्ग व उद्दामपणाची वाणी ह्यांचा मी द्वेष करते. मसलत व कार्यसिद्धी ही माझी आहेत; मी सुज्ञतामय आहे; मला सामर्थ्य आहे. माझ्या साहाय्याने राजे राज्य करतात. अधिपती न्याय ठरवतात. माझ्या साहाय्याने अधिपती, सरदार, व पृथ्वीवरील सर्व न्यायाधीश अधिकार चालवतात. माझ्यावर जे प्रीती करतात त्यांच्यावर मी प्रीती करते; जे मला परिश्रमाने शोधतात त्यांना मी सापडते. संपत्ती व मान, टिकणारे धन व न्यायत्व, ही माझ्या हाती आहेत. माझे फळ सोन्यापेक्षा, शुद्ध सोन्यापेक्षा उत्तम आहे; माझी प्राप्ती उत्कृष्ट रुप्यापेक्षा उत्तम आहे. मी नीतिमार्गाने, न्यायाच्या वाटांनी चालते; माझ्यावर प्रीती करणाऱ्यांना मी संपत्ती प्राप्त करून देते, त्यांची भांडारे भरते. (नीतिसूत्रे ८:१२–२१)

त्यानंतर देवाने आपला पुत्र कसा उत्पन्न केला आणि त्याची स्थापना कशी केली, याचे वर्णन तो पुढे करतो.

परमेश्वराने सृष्टिक्रमाच्या आरंभी आपल्या प्राचीन कृत्यांतील पहिले कृत्य, असे मला निर्माण केले. अनादिकाली, प्रारंभापासून पृथ्वीच्या पूर्वी माझी स्थापना झाली. जलाशय नव्हते, पाण्याने भरलेले झरे नव्हते, तेव्हा मी जन्म पावले. पर्वत स्थापित झाले त्यापूर्वी, डोंगरांपूर्वी, मला निर्माण केले; त्या वेळेपर्यंत त्याने पृथ्वी, शेते व पृथ्वीचा धूलिसंचय ही निर्माण केली नव्हती. त्याने आकाशे स्थापली तेव्हा मी होते; जेव्हा त्याने जलाशयाची चक्राकार मर्यादा ठरवली; जेव्हा त्याने वरती अंतराळ दृढ केले, जेव्हा जलाशयाचे झरे जोराने वाहू लागले; जलांनी त्याची आज्ञा उल्लंघू नये म्हणून जेव्हा त्याने समुद्राला मर्यादा घालून दिली; जेव्हा त्याने पृथ्वीचे पाये रेखले; तेव्हा मी त्याच्याजवळ कुशल कारागीर होते; मी त्याला नित्य आनंददायी होते; त्याच्यासमोर मी सर्वदा हर्ष पावत असे; त्याच्या पृथ्वीवर मी हर्ष करी; मनुष्यजातीच्या ठायी मी आनंद पावे. (नीतिसूत्रे ८:२२–३१)

पित्याचे पुत्राबद्दल आभार माना. त्याच्याशिवाय हे विश्व कार्य करू शकले नसते; कोणतीही गोष्ट योग्य प्रकारे चालली नसती. आता आपण देवपणाची संपूर्णता एकत्रितपणे पाहतो. पिता हा एकमेव खरा देव आहे, जो सर्व गोष्टींचा उगम आहे. त्याने एक पुत्र उत्पन्न केला आणि त्याच्याजवळ जे काही होते ते सर्व त्याला दिले. विश्व चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी पुत्रापासून प्रवाहित होतात. पुत्रामध्ये सामर्थ्य आणि ज्ञान यांच्याबरोबर विश्वास व अधीन आज्ञापालन आहे. पुत्राचे व्यक्तिमत्त्व देवाच्या सर्वव्यापी आत्म्याद्वारे संपूर्ण विश्वात प्रवाहित होते. ही एक अद्भुत व्यवस्था आहे आणि ती निर्माण करण्यात देवाने अत्यंत महान ज्ञान प्रकट केले आहे.

पौल याचा सुंदर सारांश पुढीलप्रमाणे मांडतो:

तरी आपला एकच देव म्हणजे पिता आहे, त्याच्यापासून अवघे झाले व आपण त्याच्यासाठी आहोत; आणि आपला एकच प्रभू येशू ख्रिस्त आहे, त्याच्या द्वारे अवघे झाले व आपण त्याच्या द्वारे आहोत. (१ करिंथकर ८:६)



## ४. समानता

मागील अध्यायात आपण विश्वाचा पाया घालताना देवाने प्रकट केलेल्या अद्‌भुत ज्ञानाचा अभ्यास केला. देवपणाचे सर्व गुण ज्यामध्ये दिसत होते असा पुत्र उत्पन्न केल्यामुळे, देवाची संपूर्णता देवाच्या आत्म्याद्‌वारे संपूर्ण सृष्टीच्या अंतःकरणात पोहोचविणे शक्य झाले. त्यानंतर देवाने जे पुढील कार्य केले ते म्हणजे, सृष्टीमध्ये कोणतेही स्थान असो, सर्व नैतिक प्राणिमात्रांसाठी समानतेची एक मूलभूत व्याख्या प्रदान केली.

पित्याने आपल्या पुत्राला स्वतःसमान होण्याचा अधिकार दिला. हे काळजीपूर्वक लक्षात घ्या की, पुत्राची समानता त्याला प्राप्त झालेल्या सामर्थ्यामुळे नव्हती, तर पित्याच्या अधिकारामुळे आणि आशीर्वादामुळे होती. जर पुत्राला केवळ पित्याचे सामर्थ्य प्राप्त झाले म्हणून त्याला पित्यासमान मानले गेले असते, तर समानतेची व्याख्या ही सामर्थ्याच्या समानतेवर आधारित ठरली असती. अशा व्याख्येमुळे पुत्रावर आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करून स्वतःची समानता सिद्‌ध करण्याची वेळ आली असती. अगदी हाच आग्रह सैतानाने अरण्यात येशूकडे धरला होता. त्याने आपल्या पित्याशी असलेले नाते सिद्‌ध करण्यासाठी सामर्थ्याचे प्रदर्शन करावे, अशी त्याची अपेक्षा होती. परंतु पुत्र पित्याच्या आशीर्वादित वचनावर विसंबून राहतो. पुत्र केवळ आपल्या पित्यावर विश्वास ठेवतो; त्याला कोणासमोर काहीही सिद्‌ध करण्याची गरज नाही. पिता-पुत्राचे नाते हे संपूर्ण विश्वासाठी आदर्श नाते बनले. सृष्टीतील सर्व स्तरांवरील प्राणिमात्रांतील प्रत्येक नातेसंबंध याच नात्याच्या नमुन्यानुसार असणार होते. पित्याने आपल्या पुत्राला स्वतःसमान केले.

अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, (फिलिप्पैकरांस २:५–६)

पिता कोणाचाही न्याय करत नाही, तर न्याय करण्याचे सर्व काम त्याने पुत्राकडे सोपवून दिले आहे; ह्यासाठी की, जसा पित्याचा सन्मान करतात तसा पुत्राचाही सन्मान सर्वांनी करावा. जो पुत्राचा सन्मान करत नाही तो, ज्याने मला पाठवले, त्या पित्याचा सन्मान करत नाही. (योहान ५:२२–२३)

देवाने हे अत्यंत ज्ञानपूर्वक केले, जेणेकरून समानतेची व्याख्या ही नातेसंबंधावर आधारित राहील. याचा अर्थ असा की, पित्याने निश्‍चित केलेले नातेच त्यांना समान बनवते. पुत्राला पित्याकडून वारशाने प्राप्त झालेले सर्व सामर्थ्य समानतेच्या

व्याख्येचा भाग नाही. त्यामुळे समानतेच्या या समीकरणात त्या सामर्थ्याला कोणतेही स्थान राहत नाही. देवाने हे यासाठी केले की, त्याने निर्माण केलेल्या प्राणिमात्रांनी स्वतःची तुलना त्यांना मिळालेल्या गुणांवर व क्षमतांवरून करू नये; तर एकमेकांना ओळखण्याच्या आणि समजून घेण्याच्या त्यांच्या क्षमतेवरून करावी.

पिता आणि पुत्र यांच्यातील समानतेचे स्वरूप ही संपूर्ण विश्वासाठी अत्यंत मूलभूत व्याख्या आहे. जर आपण हे नाते चुकीच्या प्रकारे समजलो, तर आपण देवाच्या राज्याचे मर्मच चुकीचे समजू. देवाच्या पुत्राविषयीची सर्वांत अद्भुत गोष्ट म्हणजे त्याला पित्याविषयी जाणून घेण्यासारखे सर्व काही माहीत आहे. संपूर्ण विश्वाला देव कसा आहे हे समजावून सांगण्यास त्याच्यासारखा दुसरा कोणीही नाही. येशूने पित्याशी असलेल्या आपल्या समानतेचे वर्णन नातेसंबंधाच्या भाषेत कसे केले आहे, ते लक्षात घ्या.

मी उत्तम मेंढपाळ आहे; जसा पिता मला ओळखतो व मी पित्याला ओळखतो: (योहान १०:१५)

म्हणूनच येशू निश्चितपणे असे म्हणू शकला:

ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले आहे. (योहान १४:९)

हे एका तत्त्वाच्या गूढ ऐक्याविषयीचे विधान नाही; तर येशू आपल्या पित्याविषयी सर्व काही जाणतो आणि तो त्याच्या स्वभावाने व व्यक्तिमत्त्वाने परिपूर्ण आहे, हे सांगणारे विधान आहे. संपूर्ण विश्वात पित्याचे मन जसे येशू जाणतो तसे दुसरे कोणीही जाणत नाही. तसेच सर्वांच्या मनाला जाणणारा तो एकमेव आहे. त्यांचे नाते हे निश्चित करते की, आपण त्यांच्या सामर्थ्याची उपासना न करता, त्यांच्यामधील प्रेमळ नात्याची उपासना करतो.

यिर्मया संदेष्टा देवाच्या राज्याचा गौरव प्रकट करतो, जेव्हा तो म्हणतो:

परमेश्वर म्हणतो, "ज्ञान्याने आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये; बलवानाने आपल्या बळाचा व श्रीमंताने आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये; बाळगायचा असला तर, मी दया करणारा व पृथ्वीवर प्रेमदया, न्याय आणि नीतिमत्ता चालवणारा परमेश्वर आहे, ह्याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, ह्याविषयी बाळगावा; ह्यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो." (यिर्मया ९:२३–२४)

अशा प्रकारे आपण पाहतो की, देवाच्या राज्याचा संपूर्ण स्वर निश्चित करणारी समानतेची व्याख्या ही पिता आणि पुत्र यांच्या ओळखीमध्ये आणि ते एकमेकांशी कसे संबंध ठेवतात यामध्येच अंतर्भूत आहे. पित्याबरोबर पुत्राने सामर्थ्य वाटून घेणे हे त्याच्या स्वतःच्या सामर्थ्यावर किंवा स्थानावर अवलंबून नाही, तर केवळ पित्याच्या इच्छेवर आणि प्रसन्नतेवर अवलंबून आहे.

ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले, आणि सर्व नावांपेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले; (फिलिप्पैकरांस २:९)

आणि तो पुन्हा ज्येष्ठ पुत्राला जगात आणतो तेव्हा तो म्हणतो, "देवाचे सर्व दूत त्याला नमन करोत." (इब्री १:६)

तेव्हा मेघातून अशी वाणी झाली की, "हा माझा (प्रिय) 'पुत्र', 'माझा निवडलेला आहे; ह्याचे तुम्ही ऐका."' (लूक ९:३५)

समानता ही पुत्राच्या गुणांवर आधारित नसून पित्याच्या अधिकारावर आधारित आहे. या व्याख्येमध्ये पिता आणि पुत्र आपापली स्वतंत्र ओळख कायम राखतात, तरीही ते समान आहेत.

याचा परिणाम प्रथमदर्शनी स्पष्टपणे दिसून येणार नाही; परंतु मानवी कुटुंबावर, विशेषतः स्त्री-पुरुष समानतेविषयी आणि ती कशावर आधारित आहे याविषयी बोलताना, त्याचा परिणाम अत्यंत व्यापक आहे.

## ५. इच्छाशक्ती

आता आपण पाहतो की, देवाच्या पुत्राचा आत्मा संपूर्ण वसलेल्या विश्वामध्ये प्रवाहित होतो आणि सर्वांच्या अंतःकरणात व मनात वास करतो. देवाचे विश्व खऱ्या अर्थाने नातेसंबंधांवर आधारित असावे, यासाठी त्याने निर्माण केलेल्या प्राणिमात्रांमध्ये पुत्राच्या या जीवनदायी आत्म्याचा स्वीकार किंवा नकार करण्याची निवड करण्याची क्षमता असणे आवश्यक होते. निवडीच्या या सामर्थ्याशिवाय संपूर्ण सृष्टी यंत्रवत आणि यांत्रिक झाली असती. देवाने प्रत्येक निर्माण केलेल्या नैतिक प्राण्याला निवड करण्याच्या सामर्थ्यासह इच्छा दिली आहे. परंतु ही निवड एका गोष्टीपुरतीच मर्यादित आहे: देवावर प्रीती करून त्याचा आणि त्याच्या पुत्राद्वारे मिळणाऱ्या

जीवनदायी आत्म्याचा स्वीकार करणे, किंवा त्याचे जीवन नाकारून स्वतःवर मृत्यू ओढवून घेणे.

परमेश्वराची सेवा करणे हे तुम्हांला गैर दिसत असले तर तुम्ही कोणाची सेवा करणार हे आजच ठरवा; महानदीपलीकडे तुमच्या पूर्वजांनी ज्या देवांची सेवा केली त्यांची, किंवा तुम्ही राहत आहात त्या देशातल्या अमोऱ्यांच्या देवांची? मी आणि माझे घराणे तर परमेश्वराची सेवा करणार.” (यहोशवा २४:१५)

तू आपल्या अगदी मनापासून परमेश्वरावर भाव ठेव, आपल्याच बुद्धीवर अवलंबून राहू नकोस; तू आपल्या सर्व मार्गांत त्याचा आदर कर, म्हणजे तो तुझा मार्गदर्शक होईल. (नीतिसूत्रे ३:५–६)

निवड करण्याच्या या सामर्थ्याचा अर्थ असा आहे की, प्रत्येक व्यक्ती देवाच्या पुत्राच्या जीवनदायी गुणांचा स्वतः स्वीकार करते. पित्याविषयी पुत्राची प्रीती ही आपली प्रीती बनते; देवाच्या पुत्राचे अधीन राहणे व त्याच्यावरचा विश्वास हेच आपले अधीन राहणे व आपला विश्वास बनतात. त्याच्या अधीन राहण्याची सतत निवड केल्यामुळे त्याचे नीतिमत्त्व आपले नीतिमत्त्व बनते. अधीन राहण्याची आणि निवड करण्याची ही क्षमता सुरुवातीला त्या नदीद्वारे मुक्तपणे प्राप्त झाली होती. परंतु, पुढे आपण पाहू, विश्वावर एक संकट आले ज्यामुळे देवाच्या कुटुंबात आणि सर्वांवर मोठे दुःख ओढवले.

## ६. एक संकट निर्माण होते

सर्व तयारी पूर्ण झाल्यावर, देवाच्या पुत्रावर विश्व निर्माण करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. आपल्या पित्याच्या सामर्थ्याद्वारे त्याने तारकागण, ग्रह आणि प्रत्येक सजीवाची निर्मिती केली. त्याने असंख्य देवदूतांचीही निर्मिती केली. त्यांपैकी पहिल्याचे नाव लुसीफर म्हणजे प्रकाश वाहणारा असे होते.

प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. 3सर्वकाही त्याच्या द्वारे झाले आणि जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. (योहान १:१–३)

आणि ज्याने [येशू ख्रिस्ताद्वारे] सर्वकाही निर्माण केले त्या देवाच्या ठायी

युगादिकालापासून गुप्त राहिलेल्या रहस्याची व्यवस्था काय, हे सर्वांना प्रकाशित करून दाखवावे; (इफिसकर ३:९)

देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्या द्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला. तो ह्या काळाच्या शेवटी पुत्राच्या द्वारे आपल्याशी बोलला आहे; त्याने त्याला सर्व गोष्टींचा वारस करून ठेवले आणि त्याच्या द्वारे त्याने विश्व निर्माण केले. (इब्री १:१–२)

लुसीफराला देवाच्या पुत्राचे स्थान माहीत होते आणि देवपणाची सर्व परिपूर्णता त्याला वारशाने प्राप्त झाली आहे, हेही त्याला ठाऊक होते. परंतु त्याने पुत्रामध्ये प्रकट झालेल्या देवाच्या ज्ञानाकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली. इच्छाशक्तीच्या देणगीद्वारे त्याच्या मनात असा प्रश्न निर्माण झाला की, देवाचा पुत्र देवासमान कोणत्या आधारावर असावा? त्याला पुत्राचे स्थान हवेसे वाटू लागले. त्याने असा विचार केला की, जर पुत्राला हे स्थान मिळू शकते, तर ते मलाही का मिळू नये? देवासारखा असणारा आणखी एक स्वतंत्र तिसरा व्यक्ती का असू शकत नाही? संपूर्ण विश्व एकत्र ठेवण्यात पुत्राची आणि त्याच्या अधीन आत्म्याची जी अत्यंत महत्त्वाची भूमिका होती, ती त्याला समजली नाही. (कलस्सैकर २:९–१०)

देवाची आणि त्याच्या पुत्राची ओळख व स्वभाव यांची कदर करण्याऐवजी, तो देवाचे सामर्थ्य आणि स्थान यांचा लोभ धरू लागला. त्याच्या विचारसरणीतील एक निष्कर्ष असा होता की, जर पुत्र देवापासून उत्पन्न झाला असेल, तर तो देवासमान असू शकत नाही. जो स्वतःमध्ये अंतर्निहित सामर्थ्य बाळगत नाही आणि ज्याचे अस्तित्व दुसऱ्यावर अवलंबून आहे, अशा व्यक्तीची आपण उपासना का करावी, असा प्रश्न त्याच्या मनात निर्माण झाला. शेवटी तो या निष्कर्षापर्यंत पोहोचला की, एकतर त्यालाही पुत्रासारखेच स्थान मिळाले पाहिजे; अन्यथा देवाचा पुत्र देवासमान मानला जाणे हे स्वतःवर अन्याय आहे, असे तो मानू लागला.

अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, (फिलिप्पैकरांस २:५–६)

हे देदिप्यमान ताऱ्या,[1] प्रभातपुत्रा, तू आकाशातून कसा पडलास! राष्ट्रांना लोळवणाऱ्या तुला धुळीत कसे टाकले! जो तू आपल्या मनात म्हणालास, 'मी

आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन, उत्तर भागातील देवसभेच्या पर्वतावर मी विराजमान होईन; मी मेघांवर आरोहण करीन, मी परात्परासमान होईन;' (यशया १४:१२–१४)

तू पाखर घालणारा अभिषिक्त करूब होतास; मी तुझी तशी योजना केली होती; तू देवाच्या पवित्र पर्वतावर होतास; तू अग्नीप्रमाणे झगझगणाऱ्या पाषाणांतून हिंडत असायचास. तुला निर्माण केले त्या दिवसापासून तुझ्या ठायी अधर्म दिसून येईपर्यंत तुझी चालचलणूक यथायोग्य होती. (यहेज्केल २८:१४–१५)

लुसीफराने आपल्या मनात ठरवले की, तो देवाच्या तारकांवर, म्हणजे देवदूतांवर, आपले स्वतःचे सिंहासन स्थापन करील. तो स्वतःला परात्पराच्या स्थानापर्यंत उंचावील. त्याचे संपूर्ण लक्ष सामर्थ्य आणि स्थान प्राप्त करण्यावर केंद्रित झाले होते. देवाचा स्वभाव मिळविण्याची त्याला इच्छा नव्हती; त्याला केवळ देवाचे स्थान आणि सामर्थ्य हवे होते.

लुसीफराच्या मनात असे विचार कसे आले, हे एक रहस्य आहे. बायबल आपल्याला ते सांगत नाही. परंतु देवाने सर्व प्राणिमात्रांना निवड करण्याचे सामर्थ्य दिले असल्यामुळे, लुसीफराने त्या सामर्थ्याचा उपयोग करून आपले मन देवाच्या ज्ञानापासून, त्याच्या अधीन राहण्यापासून आणि विश्वासाठी त्याने आखलेल्या योजनेपासून दूर वळवले.

देवाने लुसीफराला तो ज्या मार्गाने जात होता त्याविषयी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. देवाच्या पुत्राला ते स्थान का देण्यात आले होते, याची कारणेही त्याला सांगण्यात आली. परंतु लुसीफराने ऐकण्यास नकार दिला आणि तो सैतान म्हणजे दोष लावणारा झाला. त्याने देवावर दोष ठेवला की त्याने एक दोषपूर्ण राज्यव्यवस्था स्थापन केली आहे, आणि त्याने देवाच्या पुत्राची उपासना करण्यास नकार दिला. त्याऐवजी त्याने असा निर्धार केला की, जर त्याला देवासमान होता येत नसेल, तर तो केवळ अशाच देवाचा स्वीकार करील ज्याच्याकडे स्वतःचे अंतर्निहित सामर्थ्य आहे आणि ज्याने ते दुसऱ्या कोणाकडून प्राप्त केलेले नाही.

देवच जीवनाचा एकमेव उगम आहे, हा येथे समजून घेण्यासारखा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. देवाशी असहमती दर्शविणे आणि त्याच्यावर विश्वास ठेवण्यास व त्याची आज्ञा पाळण्यास नकार देणे म्हणजे जीवनापासून त्वरित तुटणे होय. जीवन केवळ

देवाच्या अधीन राहण्यातूनच मिळते, आणि अधीन राहण्याचा हा आत्मा आपल्याला केवळ पुत्राच्या आत्म्याद्वारेच प्राप्त होतो. पिता आणि पुत्र हे दोघेही इतके महत्त्वाचे असण्याचे हे अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण आहे. अधीन राहण्यास नकार देऊन लुसीफर पुत्राच्या अधीन असणाऱ्या आत्म्यालाच विरोध करीत होता. विरोध करण्याची कृती हीच द्वेष आणि खून करण्याची कृती आहे. म्हणूनच देहस्वभाव देवाविरुद्ध वैर आहे. (रोमकर ८:७) जेव्हा सैतानाने देवाला विरोध केला, तेव्हा देवाला त्वरित एक निर्णय घ्यावा लागला ज्या निर्णयाची तयारी त्याने आधीच केली होती, पण आता तो अमलात आणणे आवश्यक होते. देवाला विरोध करून लुसीफर फक्त ख्रिस्ताच्या आत्म्यालाच "नाही" म्हणत नव्हता; तर तो देवाच्या पुत्राचा खून करीत होता. तो जणू असे म्हणत होता, "मला तुझे सामर्थ्य हवे आहे, पण तुझा पुत्र नको." आता देवापुढे दोनच पर्याय होते. जीवनाच्या उगमापासून स्वतःला विभक्त करून घेतल्यामुळे लुसीफराला तात्काळ मरू द्यावे, किंवा लुसीफर आपल्या मनात प्रत्यक्षात जे करीत होता, त्यानुसार आपल्या पुत्राला मरण स्वीकारू द्यावे. ख्रिस्ताचा मृत्यू हा देवाने सूड उगवण्यासाठी केलेला न्यायनिवाड्याची कृती नव्हती; तर विश्वाच्या त्या नैसर्गिक नियमाचा परिणाम होता की, जीवन केवळ देव आणि त्याच्या पुत्राकडूनच प्राप्त होते. लुसीफराला या मृत्यूचा कधीही लाभ होणार नव्हता, कारण त्याने देवाच्या पुत्राची ओळख कधीच स्वीकारली नव्हती. परंतु ख्रिस्ताचा मृत्यू सैतान आणि त्याच्या दूतांच्या संपूर्ण बंडखोरीला पुढे चालू राहू देतो, जेणेकरून विश्वाला सैतानाच्या मनात काय होते हे स्पष्टपणे दिसावे. जर सुरुवातीलाच पुत्राने तो निर्णय स्वीकारण्याऐवजी लुसीफरच मरण पावला असता, तर त्याचे कारण कोणालाच समजले नसते; आणि लोकांनी देवावर प्रेम करण्याऐवजी त्याची भीती बाळगली असती. देवाचा पुत्र देवाच्या इच्छेविरुद्धच्या प्रतिकाराच्या त्या धावत्या रेल्वेखाली सापडला. देवापुढे दोनच पर्याय होते एकतर ती रेल्वे थांबवावी, किंवा आपल्या पुत्राला मरण स्वीकारू द्यावे, या आशेने की आपण तो खरोखर कोण आहे हे ओळखू. क्रूसावरील मृत्यूचा खरा अर्थ हाच आहे देवाच्या राज्यामधील त्याची खरी ओळख जाणून घेणे. (योहान १७:३)

सैतानाने आपले विचार इतर देवदूतांमध्ये पसरवण्यास सुरुवात केली आणि शेवटी एक तृतीयांश देवदूतांना लुसीफर बरोबर आहे असे वाटू लागले. ज्याने सर्व काही पित्याकडून वारशाने प्राप्त केले, त्या पुत्राच्या अधीन आपण का राहावे? त्याच्यामध्ये असे विशेष काय आहे? त्यांनी देवाच्या इच्छेच्या अधीन राहण्यास नकार दिला.

दुःखाची गोष्ट म्हणजे, स्वर्गात शब्दांचे युद्ध (पोलिमोस) सुरू झाले आणि सैतान व त्याच्या अनुयायांना स्वर्गातून बाहेर काढण्यात आले.

मग स्वर्गात युद्ध सुरू झाले; 'मीखाएल' व त्याचे दूत अजगराबरोबर 'युद्ध करण्यास' निघाले, आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले; तरी त्यांचे काही चालले नाही, आणि स्वर्गात त्यांचे ठिकाणही उरले नाही. मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट 'साप' खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रकटीकरण १२:७–९)

देवाने सैतानाला ताबडतोब मरू दिले असते; परंतु त्याच्या धोकादायक विचारांची संपूर्ण बीजे उघड होणे आवश्यक होते. देवाच्या पुत्राद्वारे उपलब्ध असलेले एकमेव जीवन सैतानाने नाकारले असल्यामुळे, त्याला नष्ट होऊ दिले जाऊ शकले असते. परंतु देवाने त्याचा जबरदस्तीने नाश केला, असा विचार देवदूतांच्या व उर्वरित विश्वाच्या मनात निर्माण झाला असता, आणि त्यामुळे देव स्वभावतः हिंसक आहे, हे खोटे अधिक दृढ झाले असते. सृष्टीला जीवन केवळ पुत्राद्वारेच का प्राप्त होऊ शकते, हे प्रत्येकाला स्वतः शिकणे आवश्यक होते. विश्वातील प्रत्येकाला देव बरोबर आहे की सैतान, हे स्वतः ठरविण्याची संधी मिळणार होती.

## ७. त्याच्या प्रतिरूपात निर्माण केलेले

सैतानाने आणि एक तृतीयांश देवदूतांनी देवाच्या पुत्राच्या स्थानावर आणि त्याच्या पित्याशी असलेल्या नात्यावर प्रश्न उपस्थित केला होता. पिता आणि पुत्र यांच्या नात्याचा उगम कोणीही पाहिलेला नव्हता. त्यामुळे सर्वांनी पित्यावर विश्वास ठेवणे आवश्यक होते की, सर्वांसाठी काय सर्वोत्तम आहे हे त्यालाच माहीत आहे.

आपल्या पुत्राशी असलेल्या नात्यावर एक दिवस प्रश्न उपस्थित केला जाईल, हे देवाला माहीत होते. म्हणून त्या विशेष नात्याचे अधिक पूर्ण स्पष्टीकरण देण्यासाठी त्याने आधीच एक योजना तयार केली होती. पिता-पुत्राच्या नात्यातील प्रमुखत्व आणि अधीनता यांची अत्यंत महत्त्वाची तत्त्वे संपूर्ण विश्वाला अधिक जवळून पाहता

यावीत म्हणून तो एक उदाहरण देणार होता. पृथ्वी निर्माण करण्याच्या योजनेची आखणी पिता आणि पुत्र करीत असतानाच, लुसीफराची निराशा आणखी वाढू लागली.

लुसीफराला या जगाचा अधिपती व्हायचे होते; परंतु त्याची विनंती नाकारण्यात आली. ख्रिस्त या जगाचा अधिपती होणार होता, कारण हे जग पिता आणि त्याच्या पुत्राच्या प्रतिरूपात निर्माण केले जाणार होते. त्यामुळे लुसीफर देवाच्या पुत्राचा मत्सर करू लागला. जर लुसीफराने फक्त विश्वास ठेवला असता, तर या योजनेद्वारे त्याला पिता आणि पुत्र यांच्यातील विशेष नाते अधिक चांगल्य प्रकारे समजले असते, आणि देवाच्या राज्यात पुत्राची भूमिका इतकी महत्त्वाची का आहे हेही त्याला कळले असते. परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे तसे झाले नाही.

देव आणि त्याचा पुत्र पृथ्वी निर्माण करण्याच्या योजनेनुसार पुढे गेले, जेणेकरून संपूर्ण विश्वाला त्यांच्या नात्याचे एक अत्यंत विशेष प्रतिरूप प्रकट करता येईल. आणि देव आपल्या पुत्राला म्हणाला, "आपल्या प्रतिरूपाचा, आपल्या स्वरूपाचा मनुष्य आपण निर्माण करू." (उत्पत्ति १:२६)

त्या सृष्टीच्या आठवड्यात सर्जनशीलतेचा किती महान उद्रेक झाला असेल, याची कल्पना तरी कोण करू शकेल? दिवसामागून दिवस, देवाची सर्जनशील शक्ती त्याच्या पुत्राद्वारे प्रवाहित होत असताना पृथ्वी आकार घेत होती. भूमी, गवत, फुले, वृक्ष, सूर्य, चंद्र, प्राणी आणि शेवटी सृष्टीच्या सर्वोच्च निर्मितीसाठी म्हणजे पुरुष आणि स्त्री यांच्या निर्मितीसाठी रंगमंच तयार झाला.

सृष्टीची ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, कारण ती देव आणि त्याच्या पुत्राविषयी एक महत्त्वाची गोष्ट सांगते.

देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली. (उत्पत्ति १:२७)

ही निर्मिती कशी झाली ते पाहा:

मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडवला व त्याच्या नाकपुड्यांत जीवनाचा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला. (उत्पत्ति २:७)



मग परमेश्वर देव बोलला, “मनुष्य एकटा असावा हे बरे नाही; तर त्याच्यासाठी

अनुरूप साहाय्यक मी करीन." परमेश्वर देवाने सर्व वनपशू आणि आकाशातील सर्व पक्षी हे मातीचे घडवल्यावर आदाम त्यांना कोणती नावे देतो हे पाहावे म्हणून त्याच्याकडे ते त्याने नेले; तेव्हा आदामाने प्रत्येक सजीव प्राण्याला जे नाव दिले तेच त्याचे नाव पडले. आदामाने सर्व ग्रामपशू, आकाशातील पक्षी व सर्व वनपशू, ह्यांना नावे दिली; पण आदामाला कोणी अनुरूप साहाय्यक मिळेना. मग परमेश्वर देवाने आदामाला गाढ निद्रा आणली, आणि तो झोपला तेव्हा त्याने त्याची एक फासळी काढून घेतली, तिची जागा मांसाने भरून आली; परमेश्वर देवाने आदामाची फासळी काढून तिची स्त्री बनवली आणि तिला आदामाकडे नेले. तेव्हा आदाम म्हणाला, "आता ही मात्र माझ्या हाडांतले हाड व मांसातले मांस आहे; हिला नारी म्हणावे, कारण ही नरापासून बनवली आहे." ह्यास्तव पुरुष आपल्या आईबापांना सोडून आपल्या स्त्रीशी जडून राहील; ती दोघे एकदेह होतील. आदाम व त्याची स्त्री ही दोघे नग्न होती; तरी त्यांना संकोच वाटत नसे. (उत्पत्ति २:१८–२५)

देवाने आपल्या पुत्राद्वारे आदामाला पृथ्वीच्या मातीपासून घडवले आणि मग जीवनाची नदी, म्हणजे जीवनाचा श्वास, त्याच्यामध्ये फुंकला. देवाच्या पुत्राचे बहुमोल गुण म्हणजे पित्याच्या आशीर्वादाची जाणीव, तसेच पुत्राची प्रेमळ विश्वासू वृत्ती आणि आज्ञाधारकता, हे सर्व आत्म्याद्वारे आदामाच्या इच्छेमधून सहजपणे प्रवाहित होऊन त्याचा भाग बनले. त्यामुळे आदामाला स्वाभाविकपणे देवाची सेवा करावी आणि त्याला संतुष्ट करावे असे वाटत होते, कारण या इच्छा त्याला देवाच्या पुत्राकडून आत्म्याद्वारे प्राप्त होत होत्या.

"प्रभूचे मन असे कोणी ओळखले आहे की त्याने त्याला शिकवावे?" अवावे?" आपल्याला तर ख्रिस्ताचे मन आहे. (१ करिंथकर २:१६)

देवाने आदामाला अशा परिस्थितीत ठेवले की, त्याला हळूहळू जाणीव होऊ लागली की त्याच्यामध्ये काहीतरी कमी आहे. आदामामध्ये काहीतरी उणे आहे याची जाणीव करून देण्यासाठी देवाने प्रथम त्याची निर्मितीच का केली? यातून आपल्याला देव आणि त्याच्या राज्याविषयी एक महत्त्वाची गोष्ट शिकायला मिळते. काही गोष्टी केवळ अनुभवातूनच शिकता येतात. आदामाच्या बाबतीत, त्याच्यामध्ये काहीतरी कमी आहे याची जाणीव झाल्यामुळे त्याची ती गोष्ट मिळवण्याची इच्छा अधिक तीव्र झाली; आणि जेव्हा देवाने ती त्याला दिली, तेव्हा तिच्याविषयीची त्याची कदरही अधिक वाढली.

आदामाजवळ असा कोणी साथीदार नव्हता जो त्याचे मन आणि त्याचे विचार समजू शकला असता; जो त्याच्या आनंदात सहभागी झाला असता आणि त्याचे अनुभव समजू शकला असता. आदाम प्राण्यांना नावे देत असताना, त्याला हळूहळू जाणवू लागले की त्याच्यासारखा कोणीच नाही, त्याला समजून घेणारा कोणीही नाही. या अनुभवाने देवाच्या राज्यातील सर्वांत मध्यवर्ती गोष्टीची म्हणजे जिव्हाळ्याच्या नात्याची आदामाच्या मनात तीव्र इच्छा निर्माण केली. हे समजण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्याचा स्वतः अनुभव घेणे. देवाने आदामाला नातेसंबंधांचे महत्त्व सांगितले असते आणि ते किती चांगले आहेत हे समजावून सांगितले असते; परंतु प्राण्यांना नावे देण्याचे कार्य देऊन त्याने आदामाच्या मनालाच नव्हे, तर त्याच्या अंतःकरणालाही, खरोखर महत्त्वाची गोष्ट कोणती आहे हे स्पष्टपणे जाणवून दिले.

देवाने आदामाला गाढ झोप का लावली? त्याचे शरीर उघडून त्याची एक जिवंत फासळी का काढली आणि तिच्यापासून स्त्री का निर्माण केली? हे सर्व करण्याची ही पद्धत काहीशी गुंतागुंतीची वाटत नाही का? या प्रक्रियेत एक अतिशय महत्त्वाचा धडा दडलेला आहे. आदामापासून हव्वेचे प्रकट होणे, त्याच्या स्वतःच्या देहापासून तिची निर्मिती होणे, आणि त्याच्या हृदयाजवळील कुशीतून तिचे बाहेर येणे, हे थेट पित्याकडून त्याच्या पुत्राला उत्पन्न करण्याच्या घटनेकडे निर्देश करते. देवाने आदामाच्या मेंदूचा काही भाग का घेतला नाही? त्याऐवजी त्याच्या हृदयाजवळील फासळीच का घेतली? बायबल याचे कारण सांगत नाही. परंतु माझ्यासाठी हे आदामाच्या अंतःकरणातील त्या वेदनेच्या निराकरणाकडे निर्देश करते, जी त्याला स्वतःला समजून घेणारा, त्याच्या अनुभवांना जाणणारा, आणि त्याच्यामध्ये असलेल्या बीजाचे संगोपन करण्यासाठी त्याच्या अधीन राहणारा एक सहचर नसल्यामुळे झाली होती.

देवाला कोणीही कधीच पाहिले नाही; जो एकुलता एक जन्मलेला पुत्र देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रकट केले आहे. (योहान १:१८)

कारण मी देवापासून निघालो व आलो आहे; मी आपण होऊन आलो नाही, तर त्यानेच मला पाठवले. (योहान ८:४२)

अनादिकाली, प्रारंभापासून पृथ्वीच्या पूर्वी माझी स्थापना झाली. जलाशय नव्हते, पाण्याने भरलेले झरे नव्हते, तेव्हा मी जन्म पावले. पर्वत स्थापित झाले त्यापूर्वी, डोंगरांपूर्वी, मला निर्माण केले; (नीतिसूत्रे ८:२३–२५)

कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये. (रोमकर १:१९–२०)

आपण आत्ताच पाहिलेल्या वचनांमध्ये देवाचा पुत्र पित्याच्या कुशीतून प्रकट झाल्याचा स्पष्ट पुरावा दिसून येतो. "निघालो व आलो" या शब्दांचा अर्थ "बाहेर येणे" असा आहे, आणि नीतिसूत्रे ८:२५ मध्ये पुत्र उत्पन्न झाल्याविषयी थेट उल्लेख आहे. प्रेषित पौल याविषयी भाष्य करताना म्हणतो की, सृष्टी ही आपल्याला देवपणाचे प्रत्यक्ष चित्र दाखवते, त्यामुळे कोणालाही सबब सांगता येणार नाही.

आदामाने हव्वेला प्रथमच पाहिले तेव्हा त्याच्या मनात काय भावना उमटल्या असतील, याची कल्पना तरी कोण करू शकेल? जेव्हा त्यांची नजरानजर झाली आणि त्याला जाणीव झाली की, आता अशी एक व्यक्ती त्याच्यासमोर उभी आहे जी त्याला खऱ्या अर्थाने समजू शकते आणि त्याची कदर करू शकते.

कोणीतरी असा, जो त्याच्याच स्वभावाचा होता; जो त्याचे बीज धारण करू शकत होता, त्याचे संगोपन करू शकत होता, आणि त्याच्या मुलांना व नातवंडांना अधीन राहण्याचे व आज्ञाधारकतेचे महत्त्व दाखवून देण्यासाठी आवश्यक असलेला जिवंत अधीनतेचा आदर्श बनू शकत होता. ज्याप्रमाणे देवाला या अधीनतेचे गुण प्रकट करण्यासाठी आपल्या पुत्राची आवश्यकता होती, त्याचप्रमाणे देवाने पृथ्वीवरील राज्याची अशी रचना केली की, पत्नीशिवाय पतीला आपले कुटुंब किंवा राज्य उभारता येऊ नये. आईच्या रूपातील जिवंत उदाहरणाशिवाय त्याच्या मुलांना अधीन कसे राहावे हे समजले नसते. पती आणि पत्नी यांच्या नात्यामध्ये एक अतिशय पवित्र असे नाते आहे. हे नाते योग्य प्रकारे जगले गेले, तर ते थेट पिता आणि पुत्र यांच्या नात्याकडे निर्देश करते आणि देवाच्या पुत्राविरुद्ध सैतानाने केलेले आरोप खोटे आहेत, याची संपूर्ण विश्वाला सतत आठवण करून देते.

ह्या कारणामुळे देवदूतांकरता स्त्रीने आपल्यावर असलेल्या अधिकाराचे चिन्ह मस्तकावर धारण करावे हे योग्य आहे. (१ करिंथकर ११:१०)

देवाने पती-पत्नीचे नाते असे निर्माण केले की, त्याद्वारे देवदूतांना पिता आणि पुत्र यांच्या नात्याविषयी शिक्षण मिळावे. या उद्देशासाठी निर्माण होणे हा किती अद्भुत

विशेषाधिकार आहे!

हे सत्य समजल्यावर आपल्याला कळते की, वैवाहिक जीवनाचे खरे रहस्य म्हणजे देवाच्या आत्म्याद्वारे पिता आणि पुत्र यांच्या नात्याच्या प्रतिरूपात घडत जाणे. पतीने आशीर्वादाचा उगम म्हणून कार्य करावे, आणि पत्नीने प्रेमळ विश्वास व अधीनता यांचे जिवंत उदाहरण बनावे. आदाम आणि हव्वेला एक अत्यंत उच्च आणि आनंददायी पाचारण मिळाले होते. जर ते पिता आणि पुत्राच्या प्रतिरूपात स्थिर राहिले असते, तर किती मोठे दुःख टळले असते!

## ८. लबाडीचा पिता

आपल्याला आठवते की, जर देवाने सैतानाला देवाच्या पुत्राचे सामर्थ्य आणि विशेषाधिकार मिळू दिले नाहीत, तर तो केवळ अशाच देवाची उपासना करील ज्याच्याकडे वारशाने नव्हे, तर स्वतःचेच सामर्थ्य आहे, असा निष्कर्ष त्याने काढला होता.

देवाने सैतानाने सुचवलेल्या "सुधारणा" स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर, सैतान अशा स्थितीत आला की, देवाच्या पुत्राचे अत्यंत महत्त्वाचे स्थान तो मान्य करीत नसला, तरी जीवनासाठी आपण अजूनही पित्यावरच अवलंबून आहोत हे त्याला मान्य करावे लागणार होते.

परंतु जर सैतानाला सतत हे मान्य करावे लागत असे की सर्व सामर्थ्य देवापासूनच येते, तर त्याच्या स्वतःच्या तत्त्वांवर आधारित राज्य स्थापन करणे त्याला अशक्य झाले असते. म्हणून त्याने विश्वातील सर्वांत मोठे खोटे निर्माण केले म्हणजे प्रत्येकाच्या ठायी स्वतःचे जीवन आहे. हे मानण्याचे अनेक मार्ग होते. एखादा असा विश्वास ठेवू शकत होता की, प्रत्येक प्राणी स्वभावतः अमर आहे आणि अमरत्व हा प्रत्येकाचा नैसर्गिक गुणधर्म आहे. किंवा असा विश्वास ठेवू शकत होता की, जीवन ही केवळ एक शक्ती आहे, ज्याच्याशी प्रत्येक जण जोडलेला आहे आणि तिचा आपल्या इच्छेनुसार उपयोग करू शकतो. किंवा असा विश्वास ठेवू शकत होता की, देवाने तुम्हाला अमरत्वाची देणगी दिली आहे आणि तिचा तुम्ही आपल्या सर्वोत्तम

क्षमतेनुसार उपयोग करावा. तुम्ही यांपैकी कोणता पर्याय निवडता याने काही फरक पडत नव्हता; जोपर्यंत तुम्ही असा विश्वास ठेवत होता की, तुमच्या ठायी स्वतःचा जीवनाचा उगम आहे. हेच विश्वातील सर्वांत मोठे खोटे आहे. येशू म्हणाला:

तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. (योहान ८:४४)

देवाने आपल्या पुत्राला नाकारणाऱ्यांना तात्काळ जीवनापासून वंचित होऊ दिले असते, तर हे खोटे लगेचच संपुष्टात आले असते. परंतु पुत्राने त्यांना जीवन देणे सुरूच ठेवले, जरी ते त्याच्यासाठी अत्यंत वेदनादायक होते. विश्वाला या खोट्याचे परिणाम पाहता यावेत म्हणून, पुत्राला पतित देवदूतांचे ओझे वाहावे लागले आणि ते त्याचा द्वेष करीत होते व त्याचा नाश करू इच्छित होते, तरीही त्यांना जीवन पुरवत राहावे लागले. सैतानाने आणि त्याच्या दूतांनी येशूला नाकारल्यामुळे, त्याच्याकडूनच मिळणारा प्रेमळ विश्वास, अधीनता आणि आज्ञाधारकतेचा आत्मा त्यांना प्राप्त होईनासा झाला. त्यांनी आपल्या मनामध्ये आणि आपल्या स्वभावामध्ये देवाच्या पुत्राला पुन्हा वधस्तंभावर खिळले. तरीसुद्धा, सैतानाला आपल्या तत्त्वज्ञानाचे परिणाम दाखविण्यासाठी वेळ मिळावा म्हणून देव त्याला जीवनाचे सामर्थ्य देत राहिला. देवाने हे यासाठी केले, जेणेकरून विश्व स्वतः ठरवू शकेल की योग्य मार्ग कोणाला माहीत आहे. आपण यापूर्वी पाहिले आहे की, सैतानाला देवाचा विरोध करण्याची मुभा देण्याची एक किंमत होती ती किंमत म्हणजे ज्याला नाकारले जात होते त्या देवाच्या पुत्राचे जीवन. येशूने म्हटल्याप्रमाणे, सैतान प्रारंभापासून मनुष्यघातकी होता. देवाला विरोध करताना त्याने देवाच्या पुत्राला मृत्यूस कारणीभूत ठरवले. हा मृत्यू प्रथम सैतानाच्या मनामध्ये घडत होता, आणि संपूर्ण विश्वाला प्रत्यक्षात काय घडत आहे हे दिसावे म्हणून तो प्रकट होणे आवश्यक होते. ही घटना पृथ्वीवर घडावी, अशी देवाची इच्छा नव्हती; परंतु दुःखाची गोष्ट म्हणजे, तिचे प्रकटीकरण याच पृथ्वीवर झाले.

## ९. मानवजातीची फसवणूक

मागील एका अध्यायात आपण इच्छाशक्तीच्या अत्यंत महत्त्वाच्या घटकाविषयी पाहिले. पुरुष आणि स्त्रियांना दिलेली इच्छाशक्तीची देणगी त्यांना देवाच्या अधीन राहण्याची निवड करण्यास सक्षम करते. अधीन राहण्याची निवड करण्याची क्षमता नसल्यास, खरा आशीर्वाद किंवा पित्याला संतुष्ट केल्याची जाणीव होऊ शकत नाही. पित्याला संतुष्ट केल्याची ही जाणीवच आशीर्वाद प्राप्त करून देते. याविषयी येशू काय म्हणतो ते पाहा:

ज्याने मला पाठवले तो माझ्याबरोबर आहे; त्याने मला एकटे सोडले नाही, कारण जे त्याला आवडते ते मी सर्वदा करतो." (योहान ८:२९)

येशूने आपल्या इच्छेला सतत पित्याच्या इच्छेच्या अधीन ठेवले, त्यामुळे त्याला पित्याच्या आशीर्वादाची अखंड जाणीव होती. इच्छाशक्तीच्या देणगीमुळे याशिवायही अनेक आशीर्वाद प्राप्त होतात; परंतु त्यांचा विचार या अभ्यासाच्या कक्षेबाहेरचा आहे. देवाने आदाम आणि हव्वेची निर्मिती केली तेव्हा, त्यांना त्यांच्या इच्छाशक्तीचा उपयोग करता यावा यासाठी त्याने एक मार्ग उपलब्ध करून दिला. त्यांच्यासमोर निवडीचा एक पर्याय असणे आवश्यक होते. देवाला अप्रसन्न करण्याची निवड करण्याची क्षमता नसती, तर त्याला संतुष्ट केल्याचा आशीर्वाद मिळवण्याचीही क्षमता नसती.

देवाने बरेवाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या वृक्षाचे फळ खाण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला, जेणेकरून त्याला विरोध करण्याची निवड अस्तित्वात राहील आणि त्याच्याद्वारे त्याला संतुष्ट करण्याचा आशीर्वादही प्राप्त होईल.

तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला अशी आज्ञा दिली की, "बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ यथेच्छ खा; पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील." (उत्पत्ति २:१६–१७)

या विशेष वृक्षाचे फळ न खाण्याची निवड आदाम आणि हव्वा दररोज करीत असताना, त्यांना अधीन राहण्याचा विशेष आशीर्वाद प्राप्त होत होता म्हणजे देव त्यांच्यावर संतुष्ट आहे, याची जाणीव. हा वृक्ष तेथे नसता, तर त्यांना हा आशीर्वाद प्राप्त झाला नसता.

सैतानाला स्वर्गातून काढून टाकण्यात आले असले, तरी देवाला अप्रसन्न करण्याचा

पर्याय ज्या एकाच ठिकाणी अस्तित्वात होता, त्या ठिकाणाद्वारे त्याला आपल्या जगात प्रवेश देण्यात आला. म्हणूनच आपण पाहतो की, सैतानाने सर्पाचे रूप धारण केले आणि तो बरेवाईटाचे ज्ञान करून देणाऱ्या वृक्षावर जाऊन बसला. प्रकटीकरणाच्या पुस्तकावरून हा सर्प म्हणजे सैतानच आहे, हे आपल्याला समजते.

मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट 'साप' खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रकटीकरण १२:९)

जीवनाविषयी सैतानाची विचारसरणी आपण आधी पाहिली आहे. आदाम आणि हव्वेला आपल्या राज्याकडे वळवण्यासाठी तो त्यांच्यासमोर जीवन कसे प्राप्त होते याविषयी अशी कल्पना मांडणार होता, ज्यामध्ये देवावरील अवलंबून राहण्याची आवश्यकता उरत नव्हती. सैतान काय म्हणाला ते पाहा:

परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरांत सर्प फार धूर्त होता. तो स्त्रीला म्हणाला, "तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांला सांगितले हे खरे काय?" स्त्रीने सर्पाला म्हटले, "बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे: पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शही करू नका, कराल तर मराल." सर्प स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." (उत्पत्ति ३:१–५)

सैतानाने असे सुचवले की, देवाच्या आज्ञेचा नकार देऊन त्याला अप्रसन्न केल्यामुळे शाप येणार नाही, उलट आशीर्वाद मिळेल. त्यांचे डोळे महान ज्ञान आणि बुद्धीसाठी उघडतील आणि ते स्वतः देवांसारखे होतील. त्याने असेही सांगितले की, ते मरणार नाहीत. याचा अर्थ असा होता की, देवावर अवलंबून न राहता आणि त्याच्यावर विश्वास न ठेवताही ते जगू शकतील, असे तो त्यांना शिकवत होता. ते स्वतःवर आणि स्वतःच्या निर्णयक्षमतेवर विश्वास ठेवू शकतील.

किती दुःखाची गोष्ट आहे की, हव्वेने सर्पाचा सल्ला मानला; आणि नंतर ती आदामाकडे गेली व तिने त्यालाही देवावर अविश्वास ठेवण्यास आणि सर्पाच्या त्या महान खोट्यावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त केले. एकदा त्यांनी त्या वृक्षाचे फळ खाल्ले

आणि त्या खोट्यावर विश्वास ठेवला, तेव्हा देवाविषयी, स्वतःविषयी आणि विश्व कसे कार्य करते याविषयीची त्यांची संपूर्ण समज बदलून गेली.

हे खोटे स्वीकारल्यामुळे आदाम आणि हव्वा या विश्वासापासून दूर गेले की, सर्व गोष्टी पित्यापासूनच प्रवाहित होतात. त्यांचे सुख हे त्याच्यावर विश्वास ठेवण्यावर आणि त्याच्या अधीन राहण्यावर अवलंबून आहे, ही कल्पनाही त्यांनी नाकारली. देवाच्या आज्ञेचा भंग करून त्यांनी देवाच्या पुत्राच्या सर्वांत सुंदर गुणांचाच म्हणजे विश्वास् आज्ञाधारकता आणि अधीनता यांचाच प्रत्यक्षात वध केला. देवाला आदाम आणि हव्वेला हे दाखवून देणे आवश्यक होते की, देवाच्या अधीन राहणे सोडणे म्हणजे प्रत्यक्षात त्याच्या पुत्रावर आणि तो ज्या सर्व गोष्टींचे प्रतिनिधित्व करतो त्यांच्यावरच आघात करणे होय. अधीनतेच्या आत्म्याला, म्हणजे देवाच्या पुत्राच्या आत्म्याला विरोध करून, आदाम आणि हव्वेने आपल्या मनामध्ये देवाच्या पुत्राचा खून केला होता. हा मुद्दा समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. देवाला विरोध करण्याची कृती म्हणजे त्याच्या पुत्राच्या आत्म्याचा, म्हणजे अधीनतेच्या मूर्त स्वरूपाचाच खून करण्याची कृती होय. म्हणूनच येशू लुसीफराला प्रारंभापासून मनुष्यघातकी म्हणतो.

तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. (योहान ८:४४)

ज्या सर्व देवदूतांनी देवाच्या पुत्राला नाकारले आणि द्वेषाने त्याच्या विरोधात वळले, त्यांनी आपल्या मनामध्ये त्याचा खून केला. बायबल स्पष्टपणे द्वेषाचा आणि खुनाचा संबंध जोडते.

जो कोणी आपल्या बंधूंचा द्वेष करतो तो नरहिंसक आहे; आणि कोणाही नरहिंसकाच्या ठायी सार्वकालिक जीवन राहत नाही, हे तुम्हांला माहीत आहे. (१ योहान ३:१५)

ही पृथ्वी निर्माण होण्यापूर्वीच देवाच्या पुत्राच्या बलिदानाची योजना ठरविण्यात आली होती. बंडखोर देवदूतांच्या मनात काय चालले होते, हे संपूर्ण विश्वाला समजण्याचा एकमेव मार्ग म्हणजे ते प्रत्यक्ष प्रकट होणे हा होता. हे लक्षात घ्या:

तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्ताने 'तुम्ही मुक्त झाला आहात.' ज्याचे पूर्वज्ञान जगाच्या स्थापनेच्या आधी झाले होते, तोच काळाच्या शेवटी तुमच्यासाठी प्रकट झाला. (१ पेत्र १:१९–२०)

सैतानाच्या बंडामुळे देव अनपेक्षितपणे अडचणीत सापडला नव्हता; तो त्यासाठी आधीपासूनच तयार होता. पिता आणि पुत्र यांनी परस्पर सल्लामसलत करून तारणाची योजना तयार केली होती. परंतु सैतानाच्या बंडखोरीमुळे ती योजना प्रत्यक्षात अमलात आणणे आवश्यक झाले. जेव्हा तो म्हणाला, "मी आकाशात चढेन... मी परात्परासमान होईन," तेव्हा त्या योजनेत देवाच्या पुत्रासाठी कोणतेही स्थान उरले नव्हते; त्याला दूर करून नष्ट करणे हाच त्या योजनेचा उद्देश होता.

सैतानाने आपल्या बंडखोरीचे बीज मानवजातीमध्ये पेरले आणि आता देवाचा पुत्र त्यांच्यासाठी मरण्यास बांधील झाला. ख्रिस्त भौतिक जगामध्ये हे प्रकट करणार होता की, मानवजातीने आपल्या मनामध्ये देवाच्या अधीन असणाऱ्या पुत्राचा वध केला आहे. हे सर्वांसमोर उघड होणे आवश्यक होते. ख्रिस्ताला वधस्तंभावर खिळल्याद्वारे सर्पाचे कार्य उघड झाले. म्हणूनच मोशेला खांबावर पितळी सर्प उभारण्याची आज्ञा देण्यात आली होती; वधस्तंभावरील मृत्यू हा सैतानाच्या खुनी हेतूंचा पर्दाफाश होता. आता तो ख्रिस्ताविषयीचा आपला खरा हेतू लपवू शकत नव्हता.

म्हणून जेव्हा आदाम आणि हव्वेने पाप केले आणि ख्रिस्ताच्या अधीन असणाऱ्या आत्म्याला नाकारले, तेव्हा तेही सैतानाबरोबर खुनाचे दोषी ठरले. आदाम आणि हव्वेच्या मनामध्ये ख्रिस्ताचा वध झाला होता.

'ज्या कोणाची' नावे जगाच्या स्थापनेपासून 'वधलेल्या कोकऱ्याजवळील जीवनाच्या पुस्तकात लिहिलेली' नाहीत असे पृथ्वीवर राहणारे सर्व जण त्या श्वापदाला नमन करतील. (प्रकटीकरण १३:८)

ते जर पतित झाले तर त्यांना पश्चात्ताप होईल असे त्यांचे पुन्हा नवीकरण करणे अशक्य आहे; कारण ते देवाच्या पुत्राला स्वतःपुरते नव्याने वधस्तंभावर खिळतात व त्याचा उघड अपमान करतात. (इब्री ६:६)

देवाच्या पुत्राच्या या वधाचे प्रतीक आदाम आणि हव्वेला पुढील कृतीद्वारे दाखविण्यात आले.

परमेश्वराने आदाम व त्याची स्त्री ह्यांच्यासाठी चर्मवस्त्रे करून त्यांना घातली. (उत्पत्ति ३:२१)

हे चामड्याचे अंगरखे प्राण्यांच्या कातड्यांपासून बनवले गेले होते. आदाम आणि हव्वेला वस्त्रे देण्यासाठी त्या प्राण्यांचा बळी देणे आवश्यक होते. आदाम आणि हव्वेला पाप करण्यापूर्वी वस्त्रांची गरज नव्हती. ते देवाच्या गौरवाने आच्छादलेले होते; परंतु जेव्हा त्यांनी त्याला नाकारले, तेव्हा त्यांनी तो गौरव गमावला. कोकऱ्याचा वध हा देवाच्या त्या अभिवचनाचे प्रतीक होते की, तो आपल्या पुत्राला पाठवील, जेणेकरून त्यांनी आपल्या मनामध्ये प्रत्यक्षात काय केले आहे हे त्यांना दाखवून देता येईल. देवाला विरोध करणे किती भयंकर आहे आणि अधीन राहण्यास नकार दिल्यामुळे किती भयंकर शाप येतो, हे त्यांना समजावे म्हणून. कारण असे केल्याने देवाच्या पुत्रापासून, म्हणजे अधीनतेच्या स्वरूपापासून, स्वतःला तोडून टाकले जाते.

आणि तू व स्त्री, तुझी संतती व तिची संतती ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापीन; ती तुझे डोके फोडील, व तू तिची टाच फोडशील.” (उत्पत्ति ३:१५)

दुसऱ्या दिवशी येशूला आपणाकडे येताना पाहून तो म्हणाला, “हा पाहा, जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा! (योहान १:२९)

देवाचा पुत्र हे करण्यासाठी किती विलक्षण रीतीने स्वतःला नम्र करणार होता! अधीनतेला विरोध केल्यामुळे काय घडते, हे तो संपूर्ण विश्वाला दाखवून देणार होता. त्यामुळे पित्याला सर्वांत प्रिय असलेल्या व्यक्तीच्या, म्हणजे त्याच्या पुत्राच्या आत्म्याचाच वध होतो. देवाच्या पुत्राने या विरोधाच्या शोकांतिकेला ज्या प्रकारे उत्तर दिले, ते म्हणजे अधीनतेचे एक अद्भुत प्रदर्शन. ते इतके सामर्थ्यशाली होते की, त्यानंतर संपूर्ण विश्व कधीच पूर्वीसारखे राहिले नाही. त्याचबरोबर, यामुळे संपूर्ण विश्वाला देवाचा पुत्र किती बहुमोल आहे, हेही दिसून आले. आणि आपण त्याच्या पित्यावरील अधीनतेच्या आत्म्याला आणि त्याच्या आज्ञांप्रती असलेल्या अधीनतेला जपतो व मोल देतो, तेव्हाच आपण खऱ्या अर्थाने देवाच्या पुत्राला जपतो आणि त्याचे मोल ओळखतो.

## १०. सारांश

बायबलच्या आधारे आपण प्रारंभी देवाने स्वतःविषयी काय प्रकट केले आहे, याचा काळजीपूर्वक मागोवा घेतला. त्यातून आपण पुढील गोष्टी शिकलो आहोत:

१. एकच खरा देव आहे, ज्याला पिता असे म्हटले जाते. (योहान १७:३; १ करिंथकर ८:६; १ तीमथ्य १:१७)

२. तोच सर्व जीवनाचा आणि सर्व आशीर्वादाचा उगम आहे. (याकोब १:१७)

३. त्याने आपल्या प्रतिरूपात एक पुत्र उत्पन्न केला, त्याला सर्व सामर्थ्य दिले आणि स्वतःसमान केले. (इब्री १:१–५; नीतिसूत्रे ८:१२–३०; फिलिप्पैकरांस २:६; योहान ५:२६; ८:४२; कलस्सैकर २:९)

४. देवाचा पुत्र हा देवाच्या राज्याची गुरुकिल्ली आहे. त्याच्यामध्ये विश्वासू आज्ञाधारकता, अधीनता आणि आशीर्वाद यांचे अत्यावश्यक गुण आहेत. (मत्तय ३:१७; स्तोत्रसंहिता ४०:८; योहान ८:२९)

५. पुत्राचा आत्मा संपूर्ण विश्वात प्रवाहित होतो आणि जे पित्याच्या आज्ञांच्या अधीन राहण्याची निवड करतात त्यांच्या अंतःकरणात वास करतो. (प्रकटीकरण २२:१–२; योहान ७:३७–३८; रोमकर ८:९–१०)

६. प्रथम निर्माण झालेल्या देवदूताने, म्हणजे लुसीफराने, देवाच्या पुत्राची ओळख नाकारली आणि त्याची उपासना करण्याच्या देवाच्या आज्ञेच्या अधीन राहण्यास नकार दिला. (योहान ५:२२; फिलिप्पैकरांस २:६; प्रकटीकरण १२:७–९; इब्री १:६)

७. लुसीफर सैतान बनला आणि त्याने एक तृतीयांश देवदूतांना आपल्या बरोबर या नव्या विश्वासाकडे वळवले की, देवाच्या अधीन राहण्याची आवश्यकता नाही, कारण आपल्या ठायी स्वतःचे जीवन आहे. (प्रकटीकरण १२:४; उत्पत्ति ३:४–५)

८. देवाच्या आज्ञांना विरोध करण्याची कृती म्हणजे त्याच्या पुत्राचा म्हणजे अधीनता, विश्वास आणि आज्ञाधारकतेच्या मूर्त स्वरूपाचाच वध करण्यासारखी गोष्ट आहे. (योहान ८:४४; प्रकटीकरण १३:८; १ योहान ३:१५)



९. आपल्या पित्याच्या योजनेच्या अधीन राहून, त्याने आपल्यासाठी मरण

स्वीकारले, जेणेकरून त्याला विरोध केल्यामुळे प्रत्यक्षात त्याच्या पुत्रावर काय परिणाम होतो, हे तो संपूर्ण विश्वाला दाखवून देऊ शकेल. (उत्पत्ति ३:१५; इब्री ६:६)

आता आपण बायबलच्या आधारे देव, त्याचा पुत्र आणि त्यांचा आत्मा, तसेच ते कसे कार्य करतात याचे स्पष्ट चित्र पाहिले आहे. तसेच जीवनाचा उगम कोठून होतो याविषयी सैतानाने सांगितलेल्या खोट्याची आणि त्याच्या विरोधाच्या आत्म्याचीही आपल्याला ओळख झाली आहे. आता पृथ्वीवर विकसित झालेल्या या दोन व्यवस्थांच्या सुरुवातीच्या टप्प्यांचा मागोवा घेऊया.

## ११. दोन मार्ग

मागील अध्यायांमध्ये आपण देव आणि सैतान यांच्या विचारसरणीतील एक अत्यंत महत्त्वाचा फरक पाहिला. तो पुढीलप्रमाणे आहे:

• देवाचे राज्य नातेसंबंधांच्या पवित्रतेला अधोरेखित करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहे; तर सैतानाचे राज्य सामर्थ्य मिळविण्यावर आणि त्यावर अधिकार गाजविण्यावर केंद्रित आहे.

• देवाचे राज्य अधीनता, विश्वास आणि आज्ञाधारकता यांद्वारे मिळणाऱ्या आशीर्वादावर कार्य करते; तर सैतानाचे राज्य देवाने स्थापन केलेल्या अधिकाराला विरोध करून आणि त्यापासून स्वतंत्र होण्यातच "आशीर्वाद" असल्याचे मानते.

• देवाचे राज्य समानतेची व्याख्या दुसऱ्याला जाणून घेण्याच्या क्षमतेवर करते; तर सैतानाचे राज्य समानतेची व्याख्या क्षमता, स्थान आणि स्वतःमध्ये असलेल्या सामर्थ्याद्वारे मिळवलेल्या यशावर करते.

• देवाच्या राज्यामध्ये कुटुंबव्यवस्थेद्वारे शासन केले जाते आणि त्या राज्यातील सदस्य प्रेमामुळे प्रेरित होतात; तर सैतानाच्या राज्यामध्ये सामर्थ्यावर आधारित विविध प्रकारच्या व्यवस्थांद्वारे शासन केले जाते आणि त्याच्या राज्यातील सदस्य जुलूमशाहीद्वारे वश केले जातात.

• देवाचे राज्य व्यक्तीचे मूल्य त्याच्या स्वभावावर आणि नातेसंबंधांवर ठरवते; तर

सैतानाचे राज्य व्यक्तीचे मूल्य सामर्थ्याच्या आधारावर ठरवते.

हे सर्व फरक पुढील बायबल वचनामध्ये सारांशरूपाने मांडले आहेत:

परमेश्वर म्हणतो, "ज्ञान्याने आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये; बलवानाने आपल्या बळाचा व श्रीमंताने आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये; बाळगायचा असला तर, मी दया करणारा व पृथ्वीवर प्रेमदया, न्याय आणि नीतिमत्ता चालवणारा परमेश्वर आहे, ह्याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, ह्याविषयी बाळगावा; ह्यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो." (यिर्मया ९:२३–२४)

जेव्हा आपण इतिहासाचा आढावा घेतो, तेव्हा आपल्याला दिसून येते की, देवाविषयीच्या लोकांच्या समजुती या दोन विचारसरणींनुसार विभागलेल्या आहेत. काही वेळा कोणते तत्त्व प्रत्यक्षात कार्यरत आहे, हे ओळखणे कठीण जाते; कारण सैतानाचे राज्यही सामर्थ्य मिळविण्याच्या उद्देशाने नातेसंबंधांचा उपयोग करते. त्यामुळे त्याची भाषा वरवर पाहता नातेसंबंधांवर आधारित वाटू शकते; परंतु तिचा केंद्रबिंदू मात्र अजूनही सामर्थ्य हाच असतो.

सैतानाने हव्वेला सुचविल्याप्रमाणे, आपल्या ठायी स्वतःचे जीवन आहे हा विश्वास स्वीकारल्यामुळे मनुष्य स्वाभाविकपणे स्वतःला देव समजू लागतो. या विचारसरणीमुळे देवाविषयीच्या अनेक मानवी कल्पना या प्रत्यक्षात मानवी गुणधर्म आणि क्षमतांचेच प्रतिबिंब असतात. हे ग्रीक पुराणकथांमध्ये अगदी स्पष्टपणे दिसून येते. झ्यूस हा देवांचा राजा, अफ्रोडाईट ही प्रेम व सौंदर्याची देवता, अपोलो हा संगीत, वैद्यक आणि आरोग्याचा देव, तर एरिस हा युद्धाचा देव म्हणून वर्णन केलेला आहे. हे सर्व देव म्हणजे प्रत्यक्षात मानवी गुणांचे दैवतीकरण आहे. हे मूलतः स्वतःची उपासना करणे आणि स्वतःलाच देव मानणे होय, ज्याचे आश्वासन सैतानाने एदेन बागेत हव्वेला दिले होते.

आता या दोन व्यवस्थांची स्पष्ट उदाहरणे देणाऱ्या बायबलमधील दोन व्यक्तींची तुलना करून आपण इतिहासाचा अभ्यास सुरू करूया: अब्राहाम आणि निम्रोद.

## १२. बाबेलचा पाया

अब्राहाम आणि निम्रोद यांच्या कथांकडे थेट वळण्यापूर्वी, त्या काळापर्यंतचा इतिहास आपण थोडक्यात पाहूया.

सैतानाच्या खोट्याचा स्वीकार केल्यानंतर त्याचे पहिले फळ म्हणजे भय होय. हे लक्षात घ्या:

तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला हाक मारून म्हटले, "तू कोठे आहेस?" तो म्हणाला, "मी बागेत तुझा आवाज ऐकला, तेव्हा मी नग्न आहे म्हणून भिऊन लपलो." (उत्पत्ति ३:९–१०)

आदामाने सैतानाचे खोटे स्वीकारल्यामुळे त्याचा असा विश्वास झाला की, आपल्या ठायी स्वतःचे जीवन आहे. परंतु आता त्याला हेही जाणवले की, देव हा त्याच्यापेक्षा अधिक महान आणि अधिक सामर्थ्यशाली जीवनाचा उगम आहे. त्यामुळे त्याच्या मनात भीती निर्माण झाली. जेव्हा आदामाच्या मनात स्वतःच्या ठायी जीवन आहे असा विश्वास नव्हता, आणि देव हा प्रेमळ पिता आहे जो त्याला सर्व काही देतो, यावर तो आनंदाने विश्वास ठेवत होता, तेव्हा अशा प्रकारच्या भीतीला त्याच्या मनात स्थानच नव्हते. या खोट्याचे पहिले फळ म्हणजे भय.

यानंतर या खोट्यामुळे निर्माण झालेली दुसरी गोष्ट म्हणजे गर्व. आदामाला त्याने काय केले, असे विचारण्यात आले तेव्हा, तो आपली चूक कबूल करू शकला नाही. त्याच्या गर्वाने त्याला तसे करू दिले नाही.

देवाने म्हटले, "तू नग्न आहेस हे तुला कोणी सांगितले? ज्या झाडाचे फळ तू खाऊ नकोस अशी मी तुला आज्ञा केली होती त्याचे फळ तू खाल्लेस काय?" आदाम म्हणाला, "जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले." (उत्पत्ति ३:११–१२)

आदामाने आपल्या पत्नीवर दोष ठेवला. त्याने हे लक्षात ठेवायला हवे होते की, देवाच्या व्यवस्थेमध्ये तो आपल्या कुटुंबाचा प्रमुख आहे; त्याच्या कुटुंबात जे काही घडते, त्याची अंतिम जबाबदारी त्याच्यावरच असते. पत्नीवर दोष ठेवून त्याने आपण मानत असलेले खोटेच प्रकट केले. त्याचा असा विश्वास होता की, त्याच्या पत्नीच्या ठायी असे सामर्थ्य आहे की ती त्याच्या वर्तनावर प्रभाव टाकू शकते; म्हणून तो

तिच्यावर दोष ठेवू शकतो आणि स्वतःची कोणतीही जबाबदारी स्वीकारण्याची गरज नाही. हे खरे आहे की, हव्वेने आदामाला मोहात पाडले; परंतु निवड त्याने स्वतः केली होती. त्यामुळे जबाबदारीही त्याचीच होती. परंतु त्याने ती स्वीकारली नाही.

हे या खोट्याचे दुसरे फळ म्हणजे गर्व. या दोन फळांनी बाबेलच्या उदयासाठी बीजांची पेरणी केली. यानंतर आणखी वाईट फळे उत्पन्न होणार होती.

आदाम आणि हव्वेने आपली चूक कबूल केली; परंतु बंडखोरीची बीजे त्यांच्या अंतःकरणात राहिली आणि ती त्यांचे पुत्र काईन व हाबेल यांच्याकडे गेली. हाबेलाने ख्रिस्ताच्या अधीनतेच्या आत्म्याला जपले आणि मानवजातीने पुन्हा एकदा देवाच्या पुत्राचा पूर्णपणे स्वीकार करावा यासाठी देवाने घालून दिलेल्या योजनेचे त्याने नम्रतेने पालन केले. काईनने देवाला मान्य केले, परंतु देवाच्या योजनेचे पालन करण्यास नकार दिला. येथे आपल्याला तिसरे फळ दिसते म्हणजे विरोध. त्याने आपल्या उपासनेची पद्धत स्वतःच्या इच्छेनुसार बदलली आणि कोकऱ्याच्या बलिदानाकडे दुर्लक्ष केले. हाबेलाने आपल्या भावाला देवाने दाखवून दिलेल्या मार्गाप्रमाणे वागण्याची विनंती केली; परंतु काईनने ऐकण्यास नकार दिला.

काईन सतत विरोध करीत राहिला आणि शेवटी सैतानाने त्याला क्रोधाने आपल्या भावाचा हिंसकपणे खून करण्यास प्रवृत्त केले. येथे आपल्याला आणखी काही फळे दिसतात म्हणजे क्रोध, द्वेष आणि खून. हाबेलाचा खून हा ख्रिस्ताविषयी सैतानाच्या मनात असलेल्या वृत्तीचे प्रकटीकरण होते. सौम्य आणि अधीन राहणारा हाबेल, सैतानाने प्रेरित केलेल्या आपल्या भावाच्या हातून मारला गेला. सैतानाच्या अंतःकरणात ख्रिस्ताविषयी दडलेल्या हिंसक भावनांचा हा पहिला स्पष्ट पुरावा होता. आपण यापूर्वी पाहिल्याप्रमाणे, विरोधाचा आत्मा आपल्यापासून देवाच्या आशीर्वादाची आणि त्याच्या स्वीकाराची जाणीव हिरावून घेतो. देवाचा आशीर्वाद नसल्यामुळे आपण स्वतःला असुरक्षित आणि निरर्थक समजू लागतो. काईनने आपल्या आईवडिलांच्या विनवण्याला विरोध केला, आपल्या भावाच्या विनंतीला विरोध केला आणि देवाच्या आवाहनालाही विरोध केला. काईनचा विरोध जितका वाढत गेला, तितकी त्याच्या मनातील असुरक्षितता आणि निरर्थकतेची भावना अधिकाधिक वाढत गेली.

जेव्हा देवाने काईनावर शाप घोषित केला, तेव्हा तो शाप देव त्याच्यावर टाकत नव्हता; तर तो विरोधाचा नैसर्गिक परिणाम होता म्हणजे भय, असुरक्षितता आणि

निरर्थकता. हा शाप काईनच्या स्वतःच्या कृत्यांचा स्वाभाविक परिणाम होता; देव केवळ तो व्यक्त करीत होता.

तर आता तुझ्या हातून तुझ्या भावाचे पडलेले रक्त प्राशन करण्यास ज्या भूमीने तोंड उघडले आहे, तिचा तुला शाप आहे; 12तू जमिनीची मशागत करशील तेव्हा ती ह्यापुढे तुला आपले सत्त्व देणार नाही, तू पृथ्वीवर परागंदा व भटकणारा होशील." (उत्पत्ति ४:११–१२)

"परागंदा" व "भटकणारा" या शब्दांमधून भरकटलेपणा, चंचलता आणि अस्थिरता असा अर्थ व्यक्त होतो. ही आणखी काही फळे आहेत म्हणजे असुरक्षितता, अस्थिरता आणि निरर्थकता.

आदाम आणि हव्वेने हाबेलाला गमावल्यानंतर, देवाने त्यांना आणखी एक पुत्र दिला म्हणजे शेथ. त्याच्यामध्येही आदाम आणि हाबेल यांच्याप्रमाणेच नम्र आत्मा प्रकट झाला. अशा प्रकारे आदामाच्या कुटुंबातून दोन वंश निर्माण झाले. शेथाचा वंश, जो देवाच्या आज्ञांच्या अधीन राहून पित्याच्या आशीर्वादाच्या जाणीवेने परिपूर्ण होता, तो "देवाचे पुत्र" म्हणून ओळखला जाऊ लागला; आणि काईनाचा वंश, जो बंडखोरीच्या आणि निरर्थकतेच्या फळांनी भरलेला होता, तो "मनुष्यांचे पुत्र व कन्या" म्हणून ओळखला जाऊ लागला.

सैतानाला माहीत होते की, देवाने मानवी नातेसंबंधांची रचना कुटुंबाच्या स्वरूपात केली असल्यामुळे, मुले जन्मतःच आपल्या आईवडिलांवर पूर्णपणे अवलंबून असतात. या परिस्थितीमुळे त्यांना देवावर अवलंबून राहण्यास शिकण्यास मदत झाली असती. मुलांना अधीनतेचा हा बहुमोल गुण शिकविण्यामध्ये कुटुंबातील सर्वांत महत्त्वाची व्यक्ती म्हणजे आई होती. सैतानाने देवाच्या पुत्रांना मनुष्यांच्या कन्यांशी विवाह करण्याचा मोह घातला. काईनाच्या कन्या आपल्या पित्यांच्या आत्म्याने भरलेल्या होत्या म्हणजे भय, गर्व, बंडखोरी, क्रोध आणि द्वेष. ही सर्व दुष्ट फळे अशा स्त्रियांच्या अंतःकरणात दडलेली होती, ज्यांनी आपले बाह्य रूप सुंदर बनविण्यास शिकले होते. देवाच्या पुत्रांना त्यांच्या स्वभावाची पारख करता आली नाही आणि त्यांनी त्या स्त्रियांशी विवाह केला. या विवाहांमधून अत्यंत दुष्ट जुलमी शासक निर्माण झाले. बायबल त्यांना "दिग्गज" म्हणते; परंतु याचा अर्थ प्रत्यक्ष शारीरिक आकारापेक्षा प्रचंड अहंकार आणि सामर्थ्य मिळविण्याच्या ध्यासाशी अधिक संबंधित आहे.

नंतर भूतलावर मनुष्यांची वाढ होऊ लागली आणि त्यांना कन्या झाल्या; 2तेव्हा मानवकन्या सुंदर आहेत असे देवपुत्रांनी पाहिले; आणि त्यांच्यातल्या ज्या त्यांना आवडल्या त्या त्यांनी बायका केल्या. 3तेव्हा परमेश्वर म्हणाला, “मनुष्य भ्रांत झाल्यामुळे माझ्या आत्म्याची त्याच्या ठायी सर्वकाळ सत्ता राहणार नाही; तो देहधारी आहे; तथापि मी त्याला एकशे वीस वर्षांचा काळ देईन.” 4त्या काळी भूतलावर महाकाय1 होते; पुढे देवपुत्र मानवकन्यांपाशी गेले तेव्हा त्यांना पुत्र झाले. ते प्राचीन काळचे महावीर असून नामांकित पुरुष होऊन गेले. 5पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनात येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात असे परमेश्वराने पाहिले; (उत्पत्ति ६:१–५)

अतिशय अल्प काळातच देवाच्या पुत्रांच्या अंतःकरणातून येशूचा प्रेमळ आणि अधीन राहणारा आत्मा नाहीसा झाला; आणि जवळजवळ सर्वांच्या अंतःकरणातील विचार सतत केवळ दुष्टच झाले. तेव्हा देवाने आपला आत्मा काढून घेतला आणि दुष्टपणा, विध्वंस आणि हिंसा थांबविण्यासाठी जलप्रलय येऊ दिला. त्याने पित्यांच्या अधर्माचे परिणाम त्यांच्या मुलांवर तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंत येऊ दिले.

यानंतर देवाने नोहा आणि त्याच्या कुटुंबापासून पुन्हा सुरुवात केली; परंतु लवकरच सैतानाने हामाद्वारे बाबेलच्या राज्याचा पाया घालण्यासाठी प्रवेश मिळवला. हामावर जुन्या जगातील दुष्ट लोकांचा प्रभाव पडला होता. एके दिवशी त्याने आपल्या पित्याला तंबूमध्ये नग्न व मद्यधुंद अवस्थेत पाहिले. तेव्हा त्याने त्याच्या बाबतीत हस्तक्षेप केला आणि इतके नीच कृत्य केले की, त्यातून निर्माण झालेली निरर्थकता, असुरक्षितता आणि बंडखोरी यांची फळे त्याच्या वंशजांना आपल्या वाढलेल्या असुरक्षिततेवर आणि भीतीवर मात करण्यासाठी वर्चस्व, नियंत्रण आणि दुष्टपणाच्या नव्या टोकांपर्यंत घेऊन गेली. निम्रोद हा हामाचा नातू होता. बायबल त्याच्याविषयी असे म्हणते:

कूशाला निम्रोद झाला; तो पृथ्वीवर महारथी होऊ लागला. तो परमेश्वरासमोर बलवान पारधी झाला, म्हणून ‘निम्रोदासारखा परमेश्वरासमोर बलवान पारधी’ असे म्हणण्याचा प्रघात आहे. शिनार देशात बाबेल, एरक, अक्काद व कालने ही त्याच्या राज्याचा आरंभ होत. (उत्पत्ति १०:८–१०)

10

येथे "बलवान" या शब्दाचा अर्थ सामर्थ्यशाली जुलमी शासक असा आहे. निम्रोदमध्ये अधीनतेचा कोणताही आत्मा नव्हता. बायबलमध्ये स्वतःला "राजा" ही पदवी धारण करणारा तो पहिला मनुष्य म्हणून दिसतो. तसेच, स्वर्गातील देवाची कोणतीही दखल न घेता स्वतःचे राज्य उभारणारा म्हणून त्याचे वर्णन केले आहे. त्याच्या राज्यातील पहिले नगर म्हणजे बाबेल, म्हणजेच बाबेलोन होते. आता आपण निम्रोदाच्या स्वभावाचा पाया पाहिला आहे. पुढे त्याने स्थापन केलेल्या धर्मातील मूलभूत तत्त्वांचा अभ्यास करूया.

या मुद्द्यांच्या अधिक सखोल विश्लेषणासाठी

maranathamedia.com/book/view/life-matters

येथून 'Life Matters' हे पुस्तक डाउनलोड करा.

## १३. बाबेलचे सार

निम्रोदाच्या गुंतागुंतीच्या स्वभावाची जडणघडण करणाऱ्या सर्व बाबींचा विचार केला, तर त्याने कोणत्या प्रकारची उपासना-पद्धती विकसित केली असेल, याचा आपण सहज अंदाज लावू शकतो. विरोधाच्या आत्म्याने प्रेरित झाल्यामुळे, ती बायबलमध्ये देवाविषयी प्रकट केलेल्या सत्याच्या पूर्णपणे विरुद्ध असणार होती. आणि निम्रोदाने नेमके तेच विकसित केले. इतिहासकार जोसेफस याचे पुढील विधान निम्रोदाच्या तत्त्वज्ञानाचा पाया स्पष्ट करते:

"लोकांना देवाविरुद्ध इतका उद्धटपणा व तुच्छता दाखवण्यास प्रवृत्त करणारा निम्रोद होता. तो नोहाचा मुलगा हाम याचा नातू होता. तो धाडसी आणि अत्यंत सामर्थ्यशाली मनुष्य होता. त्याने लोकांना असे समजावले की, त्यांचे सुख देवामुळे मिळाले आहे असे मानू नये; उलट त्यांच्या स्वतःच्या शौर्यामुळेच त्यांना ते सुख प्राप्त झाले आहे, असा विश्वास ठेवावा. त्याने हळूहळू राज्यपद्धतीचे रूपांतर जुलूमशाहीमध्ये केले; कारण लोकांना देवाच्या भयापासून दूर करून स्वतःच्या सामर्थ्यावर सतत अवलंबून ठेवण्याचा दुसरा कोणताही मार्ग त्याला दिसत नव्हता." — जोसेफस, *Antiquities*, पुस्तक १, अध्याय ४, परिच्छेद २.

निम्रोदाने सर्पाच्या खोट्यावर विश्वास ठेवून देवाचा आशीर्वाद नाकारला. त्याने

स्वभावापेक्षा सामर्थ्यावर भर दिला. जसे सैतानाने आदाम आणि हव्वेला स्वतःवर अवलंबून राहण्यास शिकवले होते, तसेच निम्रोदानेही लोकांना स्वतःकडेच पाहण्यास शिकवले. या तत्त्वज्ञानाचा कुटुंबव्यवस्थेवर अत्यंत दूरगामी परिणाम झाला. एका इतिहासकाराने याविषयी असे म्हटले आहे:

"पूर्वीच्या शासकांचा अधिकार हा नातेसंबंधांच्या भावनेवर आधारित होता आणि प्रमुखाचे नेतृत्व हे पित्याच्या अधिकाराचे प्रतिबिंब मानले जात होते. परंतु निम्रोद हा विशिष्ट प्रदेशाचा सार्वभौम शासक होता. त्या प्रदेशात राहणारे लोक हे त्याचे प्रजाजन होते; त्यांच्याशी असलेल्या वैयक्तिक नातेसंबंधांना त्याने कोणतेही महत्त्व दिले नाही. त्या काळापर्यंत समाज हा जमातींच्या, म्हणजेच विस्तारित कुटुंबांच्या स्वरूपात होता; परंतु आता प्रथमच एक राष्ट्र, म्हणजे राजकीय समुदाय राज्य अस्तित्वात आले." — ए. टी. जोन्स, Empires of the Bible (1904), पृ. ५१.

पूर्वीची पितृसत्ताक व्यवस्था पित्याच्या नेतृत्वाखालील आणि आईच्या संगोपनाने वाढणाऱ्या कुटुंबामध्ये आज्ञाधारकतेद्वारे मिळणाऱ्या आशीर्वादाच्या तत्त्वांना अधिक दृढ करणारी होती. निम्रोदाने हे सर्व बदलून टाकले. त्याने शेती, जमीन आणि इमारती यांसारख्या भौतिक संपत्तीवर अधिकार असलेल्या प्रादेशिक शासकाभोवती केंद्रित अशी व्यवस्था निर्माण केली. त्याआधी कुटुंबे भटक्या स्वरूपाची होती आणि नातेसंबंधांच्या भावनेवर चालत होती. अधिकार हा नात्यांमधून मिळणाऱ्या आदरावर आधारित होता. परंतु निम्रोदाने सामर्थ्याच्या भीतीद्वारे आज्ञा चालविल्या आणि जुलूमशाहीद्वारे लोकांना आपली सेवा करण्यास भाग पाडले.

निम्रोदाने आणखी एक धक्कादायक पाऊल उचलले, ज्याद्वारे पती-पत्नीच्या नात्यामधील देवाच्या प्रतिरूपाचा पूर्णपणे नाश करण्यात आला. निम्रोदाने आपल्या स्वतःच्या आईशी विवाह केला. अशा प्रकारचे वैवाहिक नाते हे पिता आणि पुत्र यांच्या नात्याच्या अगदी विरुद्ध टोकाचे उदाहरण आहे.

निम्रोदाच्या मृत्यूनंतर, त्याची पत्नी व आई असलेल्या सेमीरामीसने असा दावा केला की, निम्रोद आता सूर्यामध्ये वास करीत आहे आणि तोच त्यांचा रक्षणकर्ता व पालनकर्ता आहे. आता सेमीरामीस भौतिक आणि आध्यात्मिक जग यांच्यामधील प्रमुख दुवा बनली. अशा प्रकारे तिला "स्वर्गाची राणी" ही पदवी मिळाली. (यिर्मया ७:१८) तिच्याशी संबंध ठेवणे म्हणजे निम्रोदाच्या संरक्षणाचा आणि सामर्थ्याचा लाभ मिळविण्याचा प्रवेशद्वार मानले जाऊ लागले. ही उपासना-पद्धती मोठ्या प्रमाणावर

पसरली आणि सूर्यपूजेच्या विविध पद्धती त्या काळी ज्ञात असलेल्या जगातील अनेक भागांत रूढ झाल्या. उत्पत्ति २:३ मध्ये वर्णन केलेल्या शब्बाथाच्या वेळी देवाच्या पुत्राकडून मिळणाऱ्या विशेष आशीर्वादाऐवजी, रविवार हा उपासनेसाठी आठवड्यातील प्रमुख दिवस बनला. सेमीरामीसला तम्मूज नावाचा एक मुलगा झाला. आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी तिने असा दावा केला की, सूर्याच्या किरणांद्वारे, म्हणजे निम्रोदाच्या थेट संपर्कामुळे, त्याची गर्भधारणा झाली. अशा प्रकारे निम्रोदाचा तम्मूजामध्ये पुनर्जन्म झाला, असे मानले गेले. पुनर्जन्माची ही कल्पना वसंत ऋतूमधील नवजीवन आणि निसर्गपूजेशी जोडली गेली. वसंत आणि उन्हाळ्याची हिरवाई संपल्यानंतर तम्मूजासाठी शोक करण्याचा एक सण सुरू करण्यात आला. या उपासनेचे प्रतीक म्हणजे आपल्या बालकाला हातात धरून असलेल्या आईची प्रतिमा (मॅडोना आणि बालक) होय.

तेव्हा त्याने मला परमेश्वराच्या मंदिराच्या उत्तरेस असलेल्या दरवाजाजवळ आणले, तर तेथे स्त्रिया बसून तम्मुजासाठी शोक करत होत्या. (यहेज्केल ८:१४)

सेमीरामीसद्वारे आत्म्याच्या अमरत्वाची शिकवण प्रचलित झाली. निम्रोदाच्या व्यक्तीमध्ये मानवजातीचे दैवतीकरण, सामर्थ्याची उपासना आणि पाऊस व सुपीकता प्राप्त करण्यासाठी विविध विधी करण्याची प्रथा या सर्व गोष्टी बाबेलच्या गूढ उपासना-पद्धतीचा भाग बनल्या. सेमीरामीस ही निम्रोदाच्या सामर्थ्यापर्यंत पोहोचण्याचे प्रवेशद्वार बनल्यामुळे, ते सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी पुरुषाने स्त्रीशी लैंगिक संबंध जोडण्याचा एक विधी विकसित झाला. अशा प्रकारे मंदिरातील वेश्यांची प्रथा उदयास आली आणि सूर्याच्या उपासनेमध्ये उपासनेचा एक भाग म्हणून लैंगिक संबंधांचाही समावेश करण्यात आला. कुटुंबाशी दृढ बांधिलकी नसल्यास, ही उपासना-पद्धती देहस्वभावाच्या मनाला अत्यंत आकर्षक का वाटू शकते, हे समजणे कठीण नाही.

येथे एक महत्त्वाचा मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे. जेव्हा सामर्थ्य मिळविण्याची इच्छा हे आपले सर्वांत मोठे ध्येय बनते, तेव्हा आपण ज्या व्यक्तीकडून ते सामर्थ्य मिळवू इच्छितो त्या व्यक्तीची खरी ओळख आपल्यासाठी महत्त्वाची राहत नाही. नातेसंबंध केंद्रस्थानी असलेल्या व्यवस्थेमध्येच व्यक्तीची ओळख अत्यंत महत्त्वाची ठरते. बाबेलची उपासना-पद्धती अशा तीन व्यक्तींच्या संकल्पनेभोवती फिरत होती, ज्या रहस्यमय रीतीने एकमेकांशी जोडलेल्या होत्या. निम्रोद हा सेमीरामीसचा पुत्र

होता, पण तो तिचा पतीही होता आणि नंतर तम्मूजामध्ये त्याचा पुनर्जन्म झाला, असे मानले गेले. त्यामुळे त्या व्यक्तींच्या वास्तविक ओळखी एकमेकांत मिसळून गेल्या आणि त्या तीन व्यक्तींमध्ये असलेल्या एका रहस्यमय देवाची कल्पना निर्माण झाली. आपण आत्ताच म्हटल्याप्रमाणे, जेव्हा आपल्या उपासनेचे केंद्र सामर्थ्य असते, तेव्हा ज्या व्यक्तीची उपासना केली जाते त्या व्यक्तीची वास्तविक ओळख महत्त्वाची राहत नाही. हे स्वर्गातील देवाच्या उपासनेच्या अगदी विरुद्ध आहे. पिता आणि पुत्र यांची ओळख जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण त्यांच्या नात्यामधील आनंद आणि आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी त्यांची ओळख माहीत असणे आवश्यक आहे. त्यांच्या ओळखी कधीही गोंधळात टाकल्या, एकमेकांत मिसळल्या किंवा रहस्यमय बनवल्या जाऊ नयेत. जिथे अशी प्रक्रिया घडते, तिथे आपण खात्री बाळगू शकतो की बायबलमधील पिता आणि पुत्राची नव्हे, तर सैतानाने निर्माण केलेल्या सामर्थ्याच्या देवाचीच उपासना केली जात आहे.

माझ्या स्वतःच्या अनुभवात आणि ख्रिस्ती संदर्भात ज्यांच्याशी मी व्यवहार केला आहे त्यांच्या अनुभवातही, बायबलमधील काही वचनांमध्ये प्रत्यक्षात कोणाला उद्देशून बोलले आहे आणि प्रार्थनेत आपण प्रत्यक्षात कोणाशी बोलत आहोत, याविषयी मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्याचे मला आढळले आहे. लोकांनी आपण प्रत्यक्षात कोणाकडे प्रार्थना करीत आहोत याविषयी अनेकदा संभ्रम व्यक्त केलेला मी ऐकला आहे; तसेच त्यांच्यापैकी कोणाला वगळल्यामुळे आपण त्यांचा अपमान करू, अशीही त्यांना भीती वाटते. हा गोंधळ थेट या बाबेलच्या व्यवस्थेतून येतो आणि पिता-पुत्र व त्यांच्या स्वभावाचा शोध घेण्याऐवजी सामर्थ्याचा शोध घेण्याची वृत्ती प्रकट करतो.

हे सर्व त्या व्यक्तीच्या पूर्णपणे नकळत घडते; परंतु त्याला जे शिकवले जाते, ते त्याला अशा रहस्यमय गोंधळाकडे घेऊन जाते. बाबेलची व्यवस्था देवाचा सन्मान व त्याच्यावर प्रेम करण्याचा दावा करीत स्थापन करण्यात आली होती; परंतु प्रत्यक्षात ती देवाला विसरण्याचे आणि त्याच्या जागी मनुष्याला बसविण्याचे एक साधन आहे. बाबेलच्या सूर्यपूजेच्या इतिहासाविषयी सांगण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. परंतु बायबल देवाविषयी जे प्रकट करते, त्याच्या संदर्भात या व्यवस्थेच्या तात्त्विक पायांकडे लक्ष देणे हे आपले मुख्य उद्दिष्ट आहे. निम्रोद, सेमीरामीस आणि तम्मूज यांच्या उपासना-पद्धतीमध्ये पुढील गोष्टींवर भर देण्यात आला:

१. अंतर्निहित अमरत्वावर विश्वास

२. सामर्थ्य आणि शक्ती आतूनच येतात, असा विश्वास

३. पित्याच्या प्रमुखत्वाच्या व आशीर्वादाच्या व्यवस्थेचा नकार करून हुकूमशहा किंवा जुलमी शासक–आई व पुत्र यांच्या नातेसंबंधाला प्राधान्य देणे

४. विकृत कौटुंबिक नातेसंबंध

५. नगरे उभारणे आणि प्रदेश व संपत्ती मिळविण्यावर केंद्रित राहणे

ही व्यवस्था म्हणजे मनुष्य बरेवाईट जाणून देवांसारखा होईल, या सैतानाने दिलेल्या अभिवचनाची पूर्तता आहे. या गुणधर्मांपैकी कोणताही एक गुणधर्म ज्या उपासना-पद्धतीमध्ये आढळतो, ती उपासना-पद्धती सैतानाच्या राज्याच्या प्रभावाखाली खोलवर गेलेली आहे. आपण हे लक्षात ठेवूया की, उपासनेची ही पद्धत थेट भय, गर्व, बंडखोरी आणि लैंगिक विकृतीतून विकसित झाली आहे आणि ती बायबलमध्ये प्रकट केलेल्या देवाच्या पूर्णपणे विरोधात आहे.

## १४. वंशपरंपरेचा मागोवा

निम्रोद आणि त्याच्या सहकाऱ्यांनी देवाविषयीची आपली समजूत निर्माण करताना कोणती पावले उचलली, हे लक्षात घेणे उपयुक्त ठरेल. प्रेषित पौल या कालखंडाचे आणि त्याचा मानवजातीवर झालेल्या परिणामाचे अत्यंत संक्षिप्त विश्लेषण करतो. या चर्चेसाठी आपण त्याचाच आधार घेऊ.

प्रारंभी देवाने मनुष्याला आपल्या प्रतिरूपात निर्माण केले. "त्याच्या प्रतिरूपात निर्माण केलेले" या अध्यायात आपण याचा अभ्यास केला आहे. देवाने मनुष्याची अशी निर्मिती करण्यामागील एक कारण म्हणजे स्वतःमधील आणि आपल्या पुत्रामधील नात्याविषयी विश्वाला अधिक शिकवणे हे होते. पौल हे कशा प्रकारे सांगतो ते पाहा:

कारण देवाविषयी प्राप्त होणारे ज्ञान त्यांच्यात दिसून येते; कारण देवाने ते त्यांना दाखवून दिले आहे. कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट

दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये. (रोमकर १:१९–२०)

देवाविषयीचे हे ज्ञान समजून घेण्यापासून मानवजातीला रोखण्यासाठी सैतानाने पती-पत्नीच्या नात्यावर थेट आघात करणे हे पूर्णपणे अपेक्षितच आहे. पौल निम्रोदाच्या इतिहासाचा अत्यंत संक्षिप्त मागोवा घेतो. आपण त्याचा टप्प्याटप्प्याने मागोवा घेऊया.

देवाला ओळखूनसुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचा गौरव केला नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत; पण ते आपल्या कल्पनांनी शून्यवत झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले. स्वतःला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले; आणि अविनाशी देवाच्या गौरवाची, नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशू व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमांच्या रूपांशी त्यांनी अदलाबदल केली. ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले; असे की, त्यांच्या देहांची त्यांच्यात्यांच्यातच विटंबना व्हावी. त्यांनी देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली, आणि निर्माणकर्त्याऐवजी निर्मित वस्तूंची भक्ती व सेवा केली; तो निर्माणकर्ता तर युगानुयुग धन्यवादित आहे. आमेन. (रोमकर १:२१–२५)

हामाचा नातू असल्यामुळे निम्रोदाला स्वर्गातील देवाची स्पष्ट जाणीव होती. परंतु सामर्थ्य देवापासून येत नसून आपल्या आतूनच येते, हे खोटे निम्रोदाने स्वीकारले तेव्हा त्याने देवाचा गौरव करणे आणि देवाच्या आशीर्वादांसाठी उपकार मानणे सोडून दिले. यामुळे निम्रोद आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या मनात आपण कोण आहोत याविषयी एक खोटी आणि चुकीची भावना निर्माण झाली. देवाने पुरुष आणि स्त्रियांसाठी काळजीपूर्वक स्थापित केलेल्या भूमिका पूर्णपणे वाकवण्यात व भ्रष्ट करण्यात आल्या आणि त्यामुळे स्वर्गातून येणाऱ्या आशीर्वादाचा प्रवाहच तोडला गेला. देवाच्या पुत्राचा प्रेमळ आणि अधीन राहणारा आत्मा त्यांच्या घरांमध्ये प्रवेश करण्यापासून रोखला गेला आणि त्यांची मने अंधकारमय झाली. स्त्रियांची तथाकथित मुक्तता आणि नवीन लैंगिक स्वातंत्र्य हे प्रगतिशील व शहाणपणाचे मानले गेले; परंतु त्यामुळे ते मूर्ख बनले.

आपण पाहिले की, निम्रोदाच्या मृत्यूनंतर सेमीरामीसने असा दावा केला की, निम्रोद आता सूर्यामध्ये वास करणारा देव झाला आहे. देवाची संकल्पना नाशवंत मनुष्याच्या प्रतिमेत बदलली जात होती. मनुष्याच्या जीवनाचा उगम कोठून होतो याविषयीची त्याची समज भ्रष्ट झाली आणि स्त्री-पुरुषांच्या नातेसंबंधासाठी असलेले देवाचे दैवी

प्रतिरूप हरवले. निम्रोदाचे सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी स्त्रीची उपासना करणे, तम्मूजामध्ये निम्रोदाचा पुनर्जन्म झाल्याची कल्पना आणि त्यानंतरची निसर्गपूजा ज्यामध्ये पक्षी, चतुष्पाद पशू आणि सरपटणारे प्राणी यांचा समावेश होता या सर्व गोष्टींनी मनुष्यामधील देवाच्या प्रतिरूपाचे विद्रूपीकरण केले आणि देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली.

बाबेलचा देव मूलतः सामर्थ्याची उपासना आणि त्याचा शोध यांवर आधारित होता. आपण यापूर्वी म्हटल्याप्रमाणे, सामर्थ्याच्या शोधामध्ये ज्या व्यक्तींची उपासना केली जाते त्यांची ओळख फारशी महत्त्वाची राहत नाही; त्यांच्या सामर्थ्यापेक्षा त्यांचा स्वभाव कमी महत्त्वाचा ठरतो. निम्रोद, सेमीरामीस आणि तम्मूज यांच्या ओळखी एकमेकांत रहस्यमय रीतीने मिसळण्याचा परिणाम पुरुष आणि स्त्रियांच्या ओळखीवर आणि ते एकमेकांशी कशा प्रकारे संबंध ठेवतात यावर थेट झाला. लैंगिक संबंधांची कृती त्या संबंधात सहभागी असलेल्या व्यक्तींच्या ओळखीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आणि तिच्या प्रतीकात्मक अर्थालाही पूर्णपणे वेगळे स्वरूप प्राप्त झाले.

ह्या कारणांमुळे देवाने त्यांना दुर्वासनांच्या स्वाधीन केले; त्यांच्यातल्या स्त्रियांनी शरीराचा नैसर्गिक उपभोग सोडून विपरीत आचरण केले. तसेच पुरुषांनीही स्त्रियांचा नैसर्गिक उपभोग सोडून परस्परे कामसंतप्त होऊन पुरुषांनी पुरुषांबरोबर अनुचित कर्म केले आणि त्यांनी आपल्या भ्रांतीचे योग्य प्रतिफळ आपल्या ठायी भोगले. आणखी ज्या अर्थी देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्या अर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले. (रोमकर १:२६–२८)

समलैंगिकता ही बाबेलच्या उपासना-पद्धतीची एक स्वाभाविक परिणती आहे. लैंगिक संबंधांची कृती ही ज्या व्यक्तीशी संबंध ठेवला जातो, तिच्याकडून सामर्थ्य प्राप्त करण्याचे एक साधन बनते, जसे आपण सेमीरामीसच्या प्रवेशद्वाराच्या भूमिकेविषयी पाहिले आहे. प्रमुखत्व आणि अधीनता यांसारख्या संकल्पना आता महत्त्वाच्या राहत नाहीत. स्वतःची उपासना आणि सामर्थ्याच्या शोधामध्ये पुरुषत्व आणि स्त्रीविषयीची बायबलमधील समज हरवून जाते. यानंतर पौल याचा अंतिम परिणाम स्पष्ट करतो:

सर्व प्रकारची अनीती, जारकर्म, दुष्टपणा, लोभ, वाईटपणा ह्यांनी ते भरलेले असून हेवा, खून, कलह, कपट, कुबुद्धी ह्यांनी पुरेपूर भरलेले होते. ते चहाडखोर, निंदक,

देवाचा तिटकारा असलेले, उद्धट, गर्विष्ठ, बढाईखोर, कुकर्मकल्पक, मातापितरांची अवज्ञा करणारे, निर्बुद्ध, वचनभंग करणारे, ममताहीन, निर्दय असे होते. जे ह्या रीतीने वागतात ते मरणास पात्र आहेत, हा देवाचा निर्णय त्यांना ठाऊक असूनही ते स्वतः त्याच गोष्टी करत असतात; इतकेच केवळ नव्हे तर त्या करणाऱ्यांना संमतीही देतात. (रोमकर १:२९–३२)

जगामध्ये इतकी हिंसा, द्वेष आणि अनैतिकता का आहे, असा प्रश्न लोक विचारतात! रोमकर अध्याय १ हे सर्व कसे कार्य करते आणि असे का घडते, हे स्पष्टपणे दाखवतो. म्हणून वंशपरंपरेचा हा क्रम पुढीलप्रमाणे आहे:

१. सर्व जीवन आणि आशीर्वाद पिता व त्याच्या पुत्रापासून येतात, हे विसरणे.

२. मनुष्याच्या ठायी स्वतःचा अंतर्निहित जीवनाचा उगम आहे, असा विश्वास ठेवणे.

३. प्रमुखत्व आणि अधीनतेच्या आशीर्वादाच्या तत्त्वांचे संरक्षण करणाऱ्या कुटुंबव्यवस्थेचा नाश करणे.

४. लैंगिकतेचे विकृतीकरण.

५. आशीर्वादाच्या अभावामुळे निरर्थकता, भय, गर्व, क्रोध, द्वेष आणि खून यांच्या भावनांची तीव्रता वाढणे.

६. भ्रष्ट मानवी नातेसंबंधांचे देवावर प्रतिबिंब टाकणे; म्हणजे ओळखी एकमेकांत मिसळणे आणि स्वभावाऐवजी सामर्थ्याची उपासना करणे.

बाबेलच्या आधीन होण्याची प्रक्रिया हीच आहे. बाबेलची बायबलमधील संकल्पना केवळ एका भौतिक साम्राज्यापुरती मर्यादित नाही. ती मानवी मनावर आजवर कल्पना करण्यात आलेला सर्वांत आक्रमक आणि हिंसक हल्ला दर्शवते. मनाला गुलाम बनवण्याची तिची क्षमता थक्क करणारी आहे. ती ज्या गुप्तपणे कार्य करते, ते अत्यंत चिंताजनक आहे. तिच्या कार्यपद्धती आणि स्वरूपांचे अनेक प्रकार आहेत. एकदा मनुष्य तिच्या ताब्यात गेला की, तिच्या साखळ्या तोडणे अशक्य होते परंतु जर...

आपण अब्राहामाची कथा शिकलो तर! बाबेलमधून बाहेर पडण्यासाठी आवश्यक असलेली मूलभूत कथा अब्राहामाची कथा आहे. अब्राहाम बाबेलच्या भूमीतून आला होता. त्याचे कुटुंब बाबेलच्या उपासनेमध्ये सहभागी होते; परंतु अब्राहाम त्या व्यवस्थेतून बाहेर पडला. हे अत्यंत महत्त्वाचे आहे की, पौल रोमकरांस लिहिलेल्या पत्राची सुरुवात सुवार्तेमध्ये प्रकट झालेल्या देवाच्या सामर्थ्याविषयी बोलून करतो आणि नंतर अब्राहामाच्या जीवनामध्ये ही प्रक्रिया कशी कार्य करते, याचे सविस्तर वर्णन करतो.

कारण मला [ख्रिस्ताच्या] सुवार्तेची लाज वाटत नाही; कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला प्रथम यहूद्याला मग हेल्लेण्याला तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे. कारण तिच्यात देवाचे नीतिमत्त्व विश्वासाने विश्वासासाठी प्रकट झालेले आहे; "नीतिमान विश्वासाने जगेल" ह्या शास्त्रलेखाप्रमाणे हे आहे. (रोमकर १:१६–१८)

ह्या कारणास्तव ते अभिवचन कृपेच्या योगाने असावे म्हणून ते विश्वासाने आहे; अशासाठी की, ते अवघ्या संततीला म्हणजे जे नियमशास्त्राचे आहेत त्यांनाच केवळ नव्हे तर आपल्या सर्वांचा पिता जो अब्राहाम त्याचा जो विश्वास होता, त्याला अनुसरून जे चालतात, त्यांनाही निश्चित व्हावे. "मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे" असे अब्राहामाविषयी शास्त्रात जे लिहिलेले आहे त्याप्रमाणे तो आपल्या सर्वांचा बाप आहे. ज्या देवावर त्याने विश्वास ठेवला, जो देव मेलेल्यांना जिवंत करतो व जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो, त्याच्या दृष्टीने तो असा आहे. "तशी तुझी संतती होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला. तथापि विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशयाचे निर्जीवपण ही त्याने लक्षात घेतली; परंतु देवाच्या अभिवचनाकडे पाहून तो अविश्वासामुळे डळमळला नाही, तर विश्वासाने सबळ होऊन त्याने देवाचा गौरव केला; आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खातरी होती. (रोमकर ४:१६–२१)

बाबेलमधून बाहेर पडण्याची अब्राहामाची कथा ही ख्रिस्ताच्या सुवार्तेच्या अगदी केंद्रस्थानी आहे. या सहा टप्प्यांच्या वंशपरंपरेचा प्रभाव कसा उलटवायचा, बाबेलच्या साखळ्या कशा तोडायच्या आणि "बाबेल पडले आहे!" अशी घोषणा कशी करायची, हे

शिकण्यासाठी आता आपण याच कथेकडे वळूया.

## १५. बाबेलमधून पाचारण

बाबेलची गूढ मूर्तिपूजक उपासना जवळजवळ सार्वत्रिक झाली होती. बायबल म्हणते:

बाबेल परमेश्वराच्या हातातला सर्व पृथ्वीस मस्त करणारा सोनेरी पेला होता; राष्ट्रे त्याचा द्राक्षारस प्याली म्हणून ती वेडी झाली आहेत. (यिर्मया ५१:७)

बाबेलचा द्राक्षारस म्हणजे देवाविषयीची तिची गूढ शिकवण होय. या शिकवणी मनाला अशा प्रकारे गोंधळात टाकतात, जणू काही मनुष्य मद्यधुंद झाला आहे. या शिकवणी कुटुंबांचा नाश करतात, स्वर्गीय पित्याचा आशीर्वादाचा प्रवाह तोडतात आणि मनुष्याच्या अंतःकरणात निरर्थकता, क्रोध, असुरक्षितता आणि सामर्थ्य मिळविण्याची हताश गरज यांची खोल भावना निर्माण करतात. बाबेलच्या प्रभावामुळे भटक्या, कुटुंबावर आधारित जमातींचे रूपांतर प्रदेशावर आधारित अशा राज्यांमध्ये झाले, ज्यांचे संरक्षण सैन्याद्वारे केले जाऊ लागले. लहान गावे अधिक मोठ्या तटबंदी असलेल्या नगरांमध्ये रूपांतरित झाली, जेणेकरून त्यांचे संरक्षण करणे सोपे जावे. सैन्यांसाठी अन्न व शस्त्रे उपलब्ध करून देण्यासाठी करव्यवस्था विकसित करावी लागली. कर गोळा करण्यासाठी जुलमी राजेशाही व्यवस्था आवश्यक झाली, जेणेकरून लोकांकडून कर सक्तीने वसूल करता येतील.

रक्तपाताचा सतत सामना केल्यामुळे पुरुष कठोर बनले. त्यातच कुटुंबापासून दूर राहण्याचा वाढलेला काळ आणि अनैतिक उपासना-पद्धती यांमुळे वेश्याव्यवस्थेत मोठी वाढ झाली. यामुळे कुटुंबव्यवस्थेचा नाश झाला आणि स्त्रियांना जवळजवळ गुराढोरांपेक्षाही कमी दर्जाची वागणूक मिळू लागली; मात्र ज्या स्त्रिया मंदिरातील वेश्या होत्या, त्यांची चांगली काळजी घेतली जात असे. ही संपूर्ण प्रक्रिया मनुष्यामधील देवाच्या प्रतिरूपाचे विद्रूपीकरण करण्यासाठी, त्याची प्रतिष्ठा हिरावून घेण्यासाठी आणि देवाविरुद्धच्या आपल्या युद्धामध्ये स्वतःच्या हेतूंसाठी त्याला गुलाम बनवण्यासाठी सैतानाच्या योजनेचा एक भाग होता. देवाने मात्र दयाळू प्रेमाने प्रतिसाद दिला आणि एका मनुष्याला पाचारण केले, जेणेकरून पित्याच्या आशीर्वाद देण्याच्या कर्तव्यावर आधारित एक कौटुंबिक राज्य पुन्हा उभारता येईल. त्याचबरोबर पुढील पिढीला स्वर्गीय पिता आणि त्याच्या पुत्राच्या अधीन राहायला शिकवणाऱ्या

त्या अत्यंत बहुमोल गुणाचे संगोपन करणाऱ्या, अधीन राहणाऱ्या पत्नीचे पुनर्स्थापन करणे आवश्यक होते. अब्राहाम, म्हणजे सुरुवातीला ज्याला अब्राम म्हणून ओळखले जात होते, तो निम्रोदाच्या काळानंतर थोड्याच काळाने जगला. काही पुरावे असे सूचित करतात की, त्यांचे जीवनकाळ काही अंशी एकमेकांना ओलांडत होते आणि त्या वेळी बाबेलचा धर्म पृथ्वीच्या मोठ्या भागावर प्रभुत्व गाजवत होता.

परमेश्वराने अब्रामाला सांगितले, "तू आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशात जा; मी तुझ्यापासून मोठे राष्ट्र निर्माण करीन; मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नाव मोठे करीन; तू आशीर्वादित होशील; तुझे जे अभीष्ट चिंतितील त्यांचे मी अभीष्ट करीन; तुझे जे अनिष्ट चिंतितील त्यांचे मी अनिष्ट करीन; तुझ्या द्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादित होतील." (उत्पत्ति १२:१–३)

अब्रामाने ज्या ठिकाणाहून निघायचे होते, ते निम्रोदाच्या साम्राज्याचे अगदी केंद्रस्थान होते ते म्हणजे खास्द्यांचा ऊर.

तेरह सत्तर वर्षांचा झाल्यावर त्याला अब्राम, नाहोर व हारान हे झाले. तेरहाचे वंशज 27तेरहाची वंशावळी येणेप्रमाणे : तेरहाला अब्राम, नाहोर व हारान हे झाले, व हारानास लोट झाला. हारान आपला बाप तेरह ह्याच्यादेखत आपली जन्मभूमी खास्द्यांचे ऊर येथे मरण पावला. (उत्पत्ति ११:२६–२८)

अब्रामाला त्याच्या बालपणीच्या घरापासून दूर नेणे देवासाठी आवश्यक होते, जेणेकरून त्याला परिचित असलेल्या जुन्या संबंधांचा आणि उपासना-पद्धतींचा प्रभाव तोडता येईल. पिता आणि पुत्र यांच्या नात्यावर आधारित कौटुंबिक राज्याची समज देव अब्रामाला देणार होता. या तत्त्वांचा पूर्णपणे सखोल अनुभव येईपर्यंत देवाने साराईची संतती होण्याची क्षमता विलंबित केली.

कुटुंबाने कशा प्रकारे कार्य केले पाहिजे, याचा आदर्श निर्माण करून देवाने अब्रामाला एक आशीर्वाद बनवले. अब्राम आणि सारा यांच्या कौटुंबिक तत्त्वांचा स्वीकार करणाऱ्या प्रत्येकाला स्वर्गीय पित्याचा आशीर्वाद आपल्या अंतःकरणात प्राप्त करण्याची गुरुकिल्ली सापडली असती. तसेच, त्यांच्यामध्ये आपल्याजवळ किती सामर्थ्य आहे यावर नव्हे, तर आपण कोण आहोत यासाठी आपल्यावर प्रेम केले जाते, याची दृढ जाणीव निर्माण झाली असती. अब्रामाला अभिवचन दिलेले महान राज्य

एका स्पष्ट कौटुंबिक व्यवस्थेवर अवलंबून होते.

कारण त्याचे मोठे व समर्थ राष्ट्र खात्रीने होणार, आणि त्याच्या द्वारे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे आशीर्वादित होणार. मी त्याची निवड केली आहे ती अशासाठी की त्याने आपल्या लेकरांना व आपल्या पश्चात आपल्या घराण्याला आज्ञा द्यावी आणि त्यांनी न्यायनीतीने वागण्यासाठी परमेश्वराचा मार्ग आचरावा आणि हे अशासाठी की परमेश्वर अब्राहामाविषयी जे बोलला ते त्याने त्याला प्राप्त करून द्यावे." (उत्पत्ति १८:१८–१९)

"मी त्याला निवडले आहे" या वाक्यात देव आणि अब्राहाम यांच्यामधील अत्यंत जवळच्या नात्याची जाणीव व्यक्त होते. देव अब्राहामाला आपल्या पत्नीची आणि मुलांची काळजी कशी घ्यावी, हे शिकवत होता. त्याने अब्राहामाला समजावून सांगितले की, सुरुवातीपासूनच पती आणि पिता यांना स्वर्गीय पित्याने आपल्या कुटुंबावर "मी तुझ्यावर संतुष्ट आहे" या आशीर्वादाचा प्रवाह करण्याचे माध्यम म्हणून नेमले आहे. पती आणि पित्याला केवळ शारीरिक बीज देण्यात आले नव्हते, ज्याचे संगोपन त्याची पत्नी करून त्यातून मुले वाढवू शकत होती; तर त्याला आध्यात्मिक बीजही देण्यात आले होते. त्याद्वारे तो आपल्या पत्नीमध्ये तिच्याबद्दलची कदर व प्रेमाची जाणीव आणि आपल्या मुलांमध्ये उद्देश व मूल्याची जाणीव निर्माण करू शकत होता. नीतिसूत्रे याविषयी काय सांगते ते पाहा:

पुत्रपौत्र वृद्धांचा मुकुट होत; मुलांची शोभा त्यांचे वडील होत; (नीतिसूत्रे १७:६)

अब्राहामाला आपल्या पत्नीला आणि मुलांना आशीर्वाद देण्याची क्षमता ही साराच्या अधीन राहणाऱ्या आत्म्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून होती; त्याचा अधिकार तिने जितका स्वीकारला तितकाच तो प्रभावी होता. तिने आपल्या पतीच्या नेतृत्वासाठी जितकी अधिक प्रार्थना केली, देव त्याला योग्य शब्द आणि योग्य निर्णय देऊन आशीर्वाद देईल यावर जितका अधिक विश्वास ठेवला, आणि आपल्या पतीच्या शब्दांवर विश्वास ठेवून त्याच्या अधीन राहिली, तितके तिच्या मुलांना तिचे शब्द किती महत्त्वाचे आहेत हे जाणवले असते. आपल्या पित्याचे शब्द किती महत्त्वाचे आणि सामर्थ्यशाली आहेत, हे ठरवण्यासाठी मुले आपल्या आईकडे पाहतात. प्रेषित पेत्र आपल्याला सारा आपल्या पतीविषयी आदर करायला कशी शिकली हे सांगतो:

कारण ह्याप्रमाणे पूर्वी, देवावर आशा ठेवणाऱ्या पवित्र स्त्रियांही आपापल्या पतीच्या

अधीन राहून आपणांस शोभवत असत; जशी सारा अब्राहामाला ‘धनी म्हणून’ त्याच्या आज्ञेत राहिली; तुम्ही चांगले करत राहिल्यास व कोणत्याही भयप्रद गोष्टीला न घाबरल्यास, तुम्ही तिच्या मुली झाला आहात. (१ पेत्र ३:५–६)

अब्राहाम आणि सारा बाबेलमधून आले होते, त्यामुळे त्यांना अजून बरेच काही शिकायचे होते. त्यांच्या प्रवासात त्या दोघांकडूनही चुका झाल्या आणि त्यामुळे साराला इसहाकाला जन्म देण्यास बराच विलंब झाला. अनेक परीक्षा आणि धडे पार केल्यानंतर अब्राहाम आणि सारा देवाला इसहाकाला त्याच्या पुत्राच्या आत्म्याने इतका आशीर्वाद देऊ शकले की, येशूने वधस्तंभावर मरण स्वीकारण्यास जशी तयारी दाखवली, त्याचप्रमाणे इसहाकही मरणाला अधीन होण्यास तयार झाला. अब्राहामानेही अधीनतेच्या आत्म्याला जपायला शिकले होते. अशक्य वाटत असतानाही देवावर विश्वास ठेवण्याचा त्याने निर्धार केला होता.

ह्या गोष्टी घडल्यावर असे झाले की देवाने अब्राहामाला कसोटीस लावले; त्याने ‘अब्राहामा’, अशी हाक मारली, तेव्हा अब्राहाम म्हणाला, “काय आज्ञा?” देव म्हणाला, “तुझा पुत्र, तुझा एकुलता एक प्रिय इसहाक ह्याला घेऊन मोरिया देशात जा आणि मी तुला सांगेन त्या डोंगरावर त्याचे होमार्पण कर.” मग अब्राहामाने आपला मुलगा वधण्यासाठी हात पुढे करून सुरा घेतला. तेव्हा परमेश्वराच्या दूताने त्याला आकाशातून हाक मारून म्हटले, “अब्राहामा! अब्राहामा!” तो म्हणाला, “काय आज्ञा?” मग तो बोलला, “तू मुलावर आपला हात चालवू नकोस, त्याला काही करू नकोस; कारण तू आपल्या मुलाला, आपल्या एकुलत्या एका मुलालाही माझ्यापासून राखून ठेवले नाहीस, ह्यावरून तू देवाला भिऊन चालणारा आहेस हे मला कळले.” (उत्पत्ति २२:१–२, १०–१२)

एका मनुष्याच्या जीवनकाळातच देव त्याच्या मनातील बाबेलच्या गुलाम बनवणाऱ्या गूढ व्यवस्थेचा नाश करून स्वर्गातील खऱ्या देवाची उपासना पुन्हा प्रस्थापित करू शकला, ही गोष्ट किती अद्‌भुत आहे! बाबेलमधून अब्राहामाचा झालेला प्रवास हा आज आपल्या स्वतःच्या प्रवासासाठी पायाभूत आहे. स्वर्गातील खरा देव आणि त्याचा पुत्र या जगातील खोट्या देवांपासून आपल्याला बाहेर बोलावत आहेत आणि त्यांच्या नातेसंबंधावर आधारित कौटुंबिक राज्यात घेऊन जात आहेत. तेथे आपले मूल्य आपण काय साध्य करतो यावर नव्हे, तर आपल्या कौटुंबिक नातेसंबंधांवर आधारित असते.

या पुस्तिकेमध्ये दिलेल्या तत्त्वांचे अधिक विस्तृत स्पष्टीकरण "Life Matters" या पुस्तकात दिले आहे. सैतानाच्या राज्याचा पराभव केवळ देव आणि त्याच्या पुत्राविषयीच्या योग्य ज्ञानाद्वारे कसा करता येतो आणि कौटुंबिक आशीर्वादाची व्यवस्था कशी कार्य करते, याचे अधिक सविस्तर स्पष्टीकरण मिळवण्यासाठी

https://maranathamedia.in/ येथून हे पुस्तक मिळवा.




ज्याच्याजवळ पुत्र आहे त्याच्याजवळ जीवन आहे. असे का आहे? कारण देवाच्या पुत्रामध्ये आपल्या पित्यावर प्रेम करणाऱ्या आणि त्याच्या आज्ञांचे पालन करणाऱ्या पुत्राचे शुद्ध अंतःकरण वास करते. तो नेहमी पित्याला जे आवडते तेच करतो. त्याच्याकडे पित्याचा आशीर्वाद आणि त्याचे गाढ प्रेमही आहे. पुत्राचे अंतःकरण आपल्या पित्याच्या प्रेमात पूर्णपणे विसावलेले आहे.

आपल्या प्रिय पुत्राचा आत्मा संपूर्ण विश्वाबरोबर वाटून देणे हे पित्याचे ज्ञान आहे. हा आत्मा प्रेमळ, सौम्य आणि आज्ञाधारक आहे; तो आपल्या पित्याच्या आज्ञांवर प्रेम करतो. ख्रिस्त हा देवाचे ज्ञान आणि प्रेमळ नातेसंबंधावर आधारित राज्याची सुरक्षितता आहे. हा सौम्य आत्मा देवाच्या सिंहासनापासून जीवनाच्या झाडाद्वारे प्रवाहित होतो. सैतानाने देवाच्या पुत्राला आणि त्याच्या सौम्य आत्म्याला नाकारले. त्याचा बंडखोर आत्मा देवाच्या पुत्राच्या सौम्य, नम्र आणि आज्ञाधारक आत्म्याविरुद्ध युद्ध करीत होता. हा बंडखोरीचा आत्मा मानवजातीपर्यंत पोहोचला.

ख्रिस्ताच्या बलिदानामध्ये आपल्याला पुन्हा एकदा हा सौम्य आत्मा प्राप्त करण्याची संधी देण्यात आली आहे. हा आत्मा प्राप्त करण्याचे रहस्य म्हणजे पिता आणि पुत्र कोण आहेत हे जाणून घेणे. कारण पित्याला आणि त्याच्या पुत्राला जाणणे हेच सार्वकालिक जीवन आहे. तसेच देव आणि कोकरा यांच्या सिंहासनापासून वाहणाऱ्या जिवंत पाण्याच्या झऱ्यातून पाणी पिणे हेच जीवन आहे.